आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २१ फेब्रुवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १८२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 21 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-182 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


# मराठा आरक्षण विधेयक एकमताने मंजूर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : ओबीसी आरक्षणाला धक्का नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षण विधेयक मंगळवारी विधीमंडळाच्या पटलावर ठेवले. मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या आरक्षण विधेयकाला आमचा कुणाचाही विरोध नाही, त्यामुळे याला बहुमत म्हणा किंवा एकमत म्हणा, असे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मराठा आरक्षण विधेयक हे बहुमताऐवजी एकमताने मंजूर होत आहे, असे जाहीर केले.**



ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता, मराठा समाजाला कायद्यात टिकणारे आरक्षण आम्ही देत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्य सरकारने मंगळवारी मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावले. यामध्ये मागासवर्ग आयोगाने केलेल्या सर्वेक्षणानंतर सादर केलेला अहवाल राज्य सरकारने स्वीकारला. त्याला मंत्रिमंडळ मंजुरी मिळाल्यानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षण विधेयक विधीमंडळात मांडले.

**मराठा आरक्षण कोर्टात टिकणारच :** मराठा समाजाचे आरक्षण कोर्टात टिकणारच. राज्य सरकारने घेतलेला निर्णय मोठा आणि धाडसी निर्णय आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.
**मराठा आरक्षणासाठी शिवाजी महाराजांची शपथ :** विरोधी पक्षनेते यांनी मला याबाबतीत मला मुद्दे आणि पत्र दिले आहे. त्यामुळे या संदर्भात मी स्पष्टीकरण देत आहे. कालच शिवाजी महाराज यांची जयंती आपण साजरी केली. शिवाजी महाराज यांच्यापुढे नतमस्तक होऊन आरक्षण देण्याची शपथ घेतली होती. हे सर्व महाराष्ट्राने पाहिले आहे. मला मराठा समाजाच्या वेदनांची माहिती आहे. मी राज्याचा मुख्यमंत्री आहे, त्यामुळे एका जाती धर्माचा विचार करता येणार नाही. त्यामुळे इतर समजासाठी ही तीच भावना आहे. सब का साथ सबका विकास हे ब्रीद वाक्य मोदी साहेब यांनी दिले आहे. एकाची बाजू घेण्याच माझ्याकडून होणार नाही. कोणतयाही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची जबाबदारी आहे. आपण सर्वजण एकाच मताचे आहोत. नोकरी आणि शैशैक्षणिक आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

**सर्वोच्च न्यायालयात काय होईल यावर सगळे भविष्य अवलंबून :** शरद पवार म्हणाले, आमचे सरकार होते तेव्हा आम्ही मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले होते. परंतु, उच्च न्यायालयाने त्याविरोधात निकाल दिला. त्यानंतर देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात त्यांनी आरक्षण दिले, जे उच्च न्यायालयाने मान्य केले. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने नाकारले. या सरकारने तोच मसुदा जसाच्या तसा घेतलाय आणि हा प्रस्ताव विधानसभेने मान्य केला आहे. या विधेयकाला सर्व सदस्यांनी एकमताने पाठिंबा दिला आहे. आता या आरक्षणाचं सर्वोच्च न्यायलयात काय होईल यावर सगळं भविष्य अवलंबून आहे. त्याबद्दल आज काही सांगता येणार नाही. परंतु, या विधेयकांवरील यापूर्वीचे निकाल अनुकूल नाहीत.

**आरक्षण न्यायालयात टिकले पाहिजे :** मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे ही सर्व राजकीय पक्षांची भूमिका आहे परंतु हे आरक्षण न्यायालयात टिकले पाहिजे हे सर्वात महत्वाचे आहे. आरक्षणासाठी सरकारने विशेष अधिवेशन बोलावले पण या विधेयकावर सरकारने चर्चाही केली नाही. केवळ एकपात्री प्रयोग सादर केला आणि मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीत १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. आजचा निर्णय हा घाईघाईत घेतला असून हे आरक्षण न्यायालयात टिकेल का? असा प्रश्न आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे.

**मी राज्य मागासवर्ग आयोगाचे आभार मानतो :** अडीच कोटी घरांमध्ये जाऊन सर्व्हे करण्यात आला. त्यातल्या निष्कर्षांच्या आधारावर मराठा समाजाला अशा प्रकारे आरक्षण देणे योग्य ठरेल, असे मत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग जस्टिस शुक्रे यांनी दिला. या अहवालातल्या शिफारसी आपण स्वीकारल्या आणि त्यावर आधारीत आरक्षण दिले आहे. मी राज्य मागासवर्ग आयोगाचे आभार मानतो. त्याचप्रमाणे साडेतीन लाख कर्मचाऱ्यांनी यासाठी काम केले त्यांचेही आभार मानतो आणि विरोधी पक्षांचेही आभार मानतो कारण त्यांनीही आम्हाला पाठिंबा दिला. एकीकडे आम्ही आरक्षणाचा प्रश्न सोडवला आहे आणि मराठा समाजाच्या उत्थानासाठी आम्ही प्रयत्न करतो आहोत, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# ओबीसीमधून मराठा आरक्षणावरच मनोज जरांगे पाटील ठाम

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठा आरक्षणाच्या मसुद्याला मंजुरी देण्यात आली. त्यानंतर विधिमंडळात मराठा आरक्षणाचे विधेयक मांडण्यात आले.
मराठा आरक्षणाच्या विधेयकाचा मुसदा एकमताने मंजूर करण्यात आला. मात्र मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसीमधून मराठा आरक्षणावरच ठाम असल्याची भूमिका घेतली आहे. तसेच त्यांनी आता स्वतःवरील उपचार बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.
मनोज जरांगे म्हणाले की, मुख्यमंत्री यांच्यावर विश्वास ठेवला म्हणूनच त्यांना सहा महिन्यांचा महिन्याचा वेळ दिला. प्रत्येकवेळी भावनेच्या आहारी जाऊन आमच्या लेकरांचे वाटोळं होऊ देणार नाही. आमचे हक्काचे आरक्षण आम्हाला मिळाले पाहिजे. हरकतीचा विषय पुढे करून एवढ्या मोठ्या समाजाचा अपमान करायचा हे बरोबर नाही, असे त्यांनी म्हटले आहे.
हरकतीसाठी तुमच्याकडे यंत्रणा आहे. उद्या 12 वाजता आंतरवालीमध्ये निर्णायक बैठक होणार आहे. आंदोलनाची पुढील दिशा ठरवली आहे. तसेच मी स्वतःवरील उपचार आता बंद करत आहे असे म्हणत त्यांनी सलाईन काढून फेकले आहे. जे आरक्षण आम्हाला हवं आहे ते आम्ही मिळवणारच, असेही त्यांनी म्हटले आहे.
मुख्यमंत्री यांच्यावर आजवर विश्वास ठेवला आहे. आज देण्यात आलेलं आरक्षण निवडणुकीपर्यंत टिकल आणि उद्या जर उडाले तर बोंबलत बसायचे का?, आम्हाला त्या लफडयात पडायचं नाही. सरकारचे आरक्षण टिकेल की नाही माहित नाही.
सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करावी, अशी आमची मागणी असल्याचे मनोज जरांगे म्हणाले आहेत.
आजचा दिवस कर्तव्याची जाणीव करुन देणारा आहे. ना कोणावर अन्याय, ना कोणाला धक्का असा निर्णय घेत आहे. मुख्यमंत्री असलो तरी आंदोलकांना भेटलो. तुमच्यापेक्षा जनता मोठी आहे. यामुळे त्यांना पहिलं भेटा असं बाळासाहेब म्हणाले होते. एकनाथ शिंदे यांनी वेळ मारुन नेतील असं काही जण म्हणाले. मात्र शब्द देताना शंभरवेळा विचार करतो. तो मी पाळतो, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

**अशी दादागिरी चालणार नाही : छगन भुजबळ**
एसपी, अधिकाऱ्यांना भाडखाऊ तो म्हणतो, अशी दादागिरी चालणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच भुजबळांना बोलण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अधिक वेळ दिला नाही, त्यावरून भुजबळ चांगलेच आक्रमक झाले होते. भुजबळांनी आपले म्हणणे मांडल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, तुमच्या चिंतेंबाबत मी नोंद घेतली आहे, सरकारने याबाबत उचित उपाययोजना करावी, असे त्यांनी म्हटले.


पाहिजेत
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
अहमदनगर जिल्ह्यात
नगर शहर, नगर तालुका, जामखेड, कर्जत, श्रीगोंदा, पारनेर, राहुरी, राहता, संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव, पाथर्डी येथे प्रतिनिधी नेमणे आहेत.
इच्छुकांनी आपला अर्ज व बायोडेटा फोटोसह मेल किंवा व्हॉट्सअॅप करावा
9075716739
aadhunikkesari@gmail.com


# चंदीगडच्या महापौरपदी 'आप'चे नगरसेवक

आधुनिक केसरी न्यूज

**चंदीगड :** चंदीगडमध्ये आम आदमी पक्षाला मोठा विजय मिळाला आहे. महापौर आणि उपमहापौर निवडणुकीत चंदीगडमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला होता. या मतमोजणीत आपचे जवळपास ८ मते अवैध ठरवण्यात आली होती. परंतु, ही मते आता वैध ठरवून चंदीगडच्या महापौर पदी आपचा उमेदवार घोषित करण्यात आला आहे. पीठासीन अधिकारी अनिल मसिह यांनी दिलेला निकाल सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला आहे. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.
चंदीगड महापौरपदासाठी पुन्हा निवडणूक न घेता सध्याच्या मतपत्रिकांच्या आधारेच निकाल जाहीर केला जाईल, असं सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट केले होते. त्यानंतर, ३० जानेवारीला झालेल्या मतदान आणि मतमोजणीची संपूर्ण चित्रफीत आणि मतपत्रिकांचे मंगळवारी अवलोकन करण्यात आले. यावेळी अवैध ठरवलेली आठही मते वैध ठरवून पुन्हा मतमोजणी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. ही मतमोजणी पुन्हा झाल्यानंतर आपचे नगरसेवक कुलदीप कुमार यांचा विजय झाला आहे. याचिकाकर्त्यांच्या बाजूने टाकण्यात आलेल्या आठ मतपत्रिकांचा विपर्यास करण्याचा अनिल मसिह यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे खंडपीठाने नमूद केले. पीठासीन अधिकारी अनिल मसिह यांनी मतपत्रिकेत छेडाछाड झाल्याचे मान्य केले, असंही खंडपीठाने नोंदवले. पीठासीन अधिकाऱ्याचे वर्तन दोन पातळ्यांवर घसरले आहे.

# तीनशे किल्ल्यांवर स्वच्छतेसह केले बीजारोपण...

## समर्थ सेवा मार्गाचा दुर्गसंवर्धन पंधरवडा


आधुनिक केसरी न्यूज

बाजीराव सोनवणे
**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग व त्र्यंबकेश्वर येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठाच्या अंतर्गत सक्रिय व कार्यरत असलेल्या पर्यावरण व प्रकृती विभागाअंतर्गत व्यापक दुर्ग संवर्धन अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानांतर्गत राज्यभरातले तीनशेहून अधिक गडकिल्ल्यांवर स्वच्छतेसह विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत, अशी माहिती सेवा मार्गाच्या पर्यावरण, प्रकृती व कृषी अभियानाचे प्रमुख आबासाहेब मोरे यांनी दिली. दुर्ग संवर्धन अभियाना अंतर्गत वर्षभर सातत्याने या प्रकारचे काम चालूच असते परंतु या कार्याला अधिक गती मिळावी म्हणून 17 फेब्रुवारी ते 2 मार्च या पंधरवाड्यात राज्यभरातील महिला पुरुष सेवेकरी आपापल्या भागातील गडकिल्ल्यांवर जाऊन स्वच्छता करून



तेथील देवदेवतांचा सन्मानही करणार आहेत. उपलब्ध जागेवर बीजारोपण करून भविष्यात या वृक्षवल्लीचे संवर्धन करण्याची मोहिमही या अभियाना अंतर्गत हाती घेण्यात आली असून गडकिल्ल्यांना लागून असलेल्या गावांमध्ये ग्राम अभियान राबवून लोकजागरण करण्यात येणार आहे. नव्या पिढीपर्यंत आपला संघर्षाचा परंतु तेवढाच गौरवशाली, अभिमानास्पद इतिहास पोहोचावा हा एक हेतू या अभियान मागे आहेच. दुर्गसंवर्धन बाबत अधिक माहिती देताना आबासाहेब मोरे म्हणाले की, साडेतीनशे वर्षांपूर्वी परक्या, धर्मांध, जुलमी सत्तांचा नंगानाच महाराष्ट्रभर चालला होता.रयतेला सर्वच असह्य झाले पण हे सर्व अन्याय, अत्याचार सहन करण्यापलीकडे ते काही करू शकत नव्हते. पैसा, अडका, जमीन, जुमला, माय, बहिणीची अब्रू सर्वच धोक्यात होते. या सर्व अराजकातून सुटका करण्यासाठी ईश्वरीशक्तीने शिवाजी महाराजांच्या रुपाने जन्म घेतला आणि हिंदवी स्वराज्याची वाटचाल सुरू झाली. जुलमी सत्ता उलथावून टाकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली ते गडकोट, किल्ल्यांनी. शिवनेरी, तोरणा, पुरंदर, सिंहगड, राजगड, लोहगड, रायगड, हरिहर, कर्नाळा, देवगिरी, हरिश्चंद्र, रामशेज, बोरगड, सज्जनगड, विशाळगड, साल्हेर असे साडेतीनशे पेक्षा जादा किल्ले हिंदवी स्वराज्यासाठी आभूषणे ठरली. परंतु आज या किल्ल्यांची जी अवस्था आहे, ती पाहता कुणाही संवेदनशील माणसाचे मन अस्वस्थ आणि घायाळ झाल्याशिवाय राहणार नाही.
या घायाळ अवस्थेतून या शक्तीस्थळांची सुटका करून त्यांना गतवैभव प्राप्त करून देणे आज मोठे अवघड दिसते आहे परंतु आहे ती संपत्ती सांभाळून ठेवणे आपल्या हाती आहे. याचसाठी समर्थ सेवा मार्गाने दुर्ग अभियानाच्या मार्गातून खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न केला आहे. 2 मार्चपर्यंत चालणाऱ्या या अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहनही आबासाहेब मोरे यांनी केले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## रामायणातील 'प्रेम' रस

आधुनिक केसरी

'रामायण' चार अक्षरी शब्द ! शतकानुशतके भारतीय मनाला मोहिनी घालणारे महाकाव्य ! रामायणात प्रेमरसाचा मंगल कलश काठोकाठ ओसंडून वाहतो आहे. ' वाल्मिकीच्या भाव मनीचे ' प्रामुख्याने प्रेमरसात भिजूनच बाहेर पडले आहेत. राजा, गुरु, पिता, पुत्र, माता, बंधू, सखा, भक्त, सेवक आदी नात्यातील हिमालयाएवढ्या उंचीचे आदर्श तर रामायणाने उभे केले आहेतच पण प्रेम काय असते, प्रेमातील समर्पण कसे असते याचे जे आदर्श रामायणात आहेत, ते अन्यत्र कोठेही आढळत नाहीत. प्रेमाचा सप्ताह आणि त्यातील विविध दिनविशेष साजरे करणे, व्हॅलेंटाईन डे ला भेटवस्तू आदी देऊन आपल्या प्रेमाचे प्रकटीकरण करणे या गोष्टी आज मोठया प्रमाणावर होत असताना रामायणातील विविध व्यक्तिरेखा प्रेम कसे असावे या विषयावर मोठा सुंदर प्रकाश टाकतात. या प्रेमात काय नाही ? त्याग, सेवा, समर्पण आहे. आकाशाची उदात्तता आहे, सागराची खोली आहे, हिमालयाची उंची आहे, गंगाजलाचे पावित्र्य आहे, कुसुमांचा मंद दरवळणारा सुगंध आहे आणि अमृताचे माधुर्य आहे. ' राम ' शब्दाचा अर्थच मुळी आनंद देणारा असा आहे. ' रम ' या शब्दापासून ' राम ' शब्द तयार झाला आहे. ' रमन ' म्हणजे वास करणे. सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात जो ' रमतो ' तो राम. ' रमते कणे कणे इति राम. ' प्रेम असल्याशिवाय कोणाच्या हृदयात निवास शक्य तरी आहे का ? रामाला आपण मर्यादापुरुषोत्तम म्हणतो. त्याचा पराक्रम कळिकाळालाही भय वाटेल असा आहे, सागराहूनही उदारहृदयी तो आहे. पण सर्वगुणसंपन्न असलेला राम मर्यादापुरुषोत्तम आहे. पुरुषानं कसं वागावं याचा आदर्श म्हणजे राम आहे. त्याचं वागणं म्हणजे नराकडून नारायणाकडे जाण्याचा प्रवास आहे. पण हा प्रवास भावनाशून्य किंवा कोरडा नाही. तो प्रेमानं ओथंबलेला आहे. किंबहुना प्रेम असल्याशिवाय असा प्रवास शक्यही नाही. आपल्या मातापित्यांवर रामाचं अपार प्रेम आहे. त्यांच्या आज्ञेखातर आणि इच्छेखातर वनवास देखील आनंदाने पत्करण्याची त्याची तयारी आहे.



## आनंदी पहाट

## व्यक्तीच्या विचारांतील विवेक महत्त्वाचा

आधुनिक केसरी

आजवर मनावर अनेकप्रकारे अनेकांनी भाष्य केले आहे. संतांनी देखील जगाला एकच गोष्ट सांगितली, ती म्हणजे मनाचे स्वास्थ्य टिकवा. ह्याचा अर्थ शरीराकडे दुर्लक्ष करा, असे अजिबात नाही. परंतू मन दिसत नसल्यामुळे त्याचा विचार आपल्याकडून कमी होत असतो. शरीर मात्र दिसत असते, त्यामुळेच ते सदैव सुंदर ठेवले जात असते. शरीराचीच काळजी अधिक घेतली जाते. शरीराला पौष्टिक खाद्य देण्यातही आपण कधी मागे हटत नाही, खर्चाचा तर अजिबातच विचार करत नाही. शारीरिक तंदुरुस्तीसाठी खरे म्हणजे मानसिक स्वास्थ्यच अधिक महत्वाचे आणि मोलाचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने एकूणच जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या कार्यकृतीत इतका विचार केलेला नसतो, हेही तितकेच खरे. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. ह्यात सकारात्मक आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. त्यासाठी आपल्या जिव्हाळ्याचे, हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. ते घर कितीही छोटे असले तरीही फरक पडत नाही, पण आपले मन मात्र मोठेच असायला लागते. अर्थात, घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते.



आधुनिक केसरी

## मुक्तीचा सोहळा | अनुपम्य

आंधळा हा खेळ | खेळसी का जीवा ||
मृगजळी धावा | फुका करी ||१||
कष्टाविन फळ | जाण ते पातक ||
आशा ही घातक | आयुष्याला ||२||
भवसागरात | नको सोडू नाव ||
विकाराचे गाव | सोड आधी ||३||
पाऊलीचा खेळ | उत्तम खेळावा ||
कर्मात सुखावा | आनंदाचा ||४||
घेता हरिनाम | हारी चिंता सारी ||
गोविंद मुरारी | हृदयात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

कळा तिडकी लागती । कां ते दंत उन्मळती ।
अधर जिव्हा रगडती । या नांव आध्यात्मिक ॥३८॥
कर्णदुःख नेत्र दुःख । नाना दुःखें घडे शोक ।
गर्भांध आणी नपुश्यक । या नांव आध्यात्मिक ॥३९॥
फुलें वडस आणी पडळें । कीड गर्ता रातांधळें ।
दुश्चित्त भ्रमिष्ट आणी खुळें । या नांव आध्यात्मिक ॥४०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

निज स्वरुप के ज्ञान में,
परखो शब्द स्वरुप ।
तब चेतन चेतन मिलै, चेतन धर्म अनूप
।।६०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/६०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
निज स्वरूप प्रत्यक्ष झाल्यावर शब्दस्वरूप परब्रह्माला प्रत्यक्ष पाहावे, तेव्हा चेतन आत्म्याचा चेतन परब्रह्माशी योग होऊन अनुपम चेतन धर्माची प्राप्ती होईल. चेतन-चेतनचा संबंधच योग आहे आणि यालाच भक्ती सुद्धा म्हणतात. प्रकृतीचा संबंध सोडून शुद्ध चेतन निज स्वरूपाने आत्मा परब्रह्माची उपासना करतो. प्राकृतिक साधनांनी परमेश्वराची उपासना होत नाही किंवा आत्म्याला शुद्ध चेतन प्रकाश परमानंदाचीही प्राप्ती होत नाही.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## अनुमान निरसन

आधुनिक केसरी




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

समर्थांचा विज्ञान प्रधान दृष्टीकोन. विज्ञान म्हणजे निरीक्षण, प्रयोग यांनी सिध्द झालेले ज्ञान होय. असे जे सिध्दांत असतात ते भूत, भविष्य, वर्तमान घटनांचा निश्चित आणि निःसंदेह अर्थ सांगतात. अशा सिद्धांताच्या बाबतीत कुणाच्याही पोकळ वल्गनानां काहीही अर्थ नसतो. सर्व संतांचे ग्रंथ परमात्म वस्तूंचे बुद्धिनिष्ठ वर्णन करतात. हे जेवढे खरे तेवढेचं त्यातले त्यात पारमार्थिक घटनांचा पुरावा आणि सुक्ष्म अनुभव यांचा आधार घेतल्यास खेरीज काही बोलायचे नाही ही तर आपल्याला समर्थांची शिकवण आहे. समर्थांचे विचार विज्ञाननिष्ठ असल्याने कोणत्याही विषयावर खंडनमंडन करत असताना विवेचन करण्याच्या ओघामध्ये परमार्था बद्दलच्या आणि देवा बद्दलच्या भ्रामक लोकसमजुतीवर विचार जागृती करण्याचे फार मोठे कार्य करतात. समर्थ रामदास स्वामी चे बहुमोल विचार. कोणत्याही विषयावर अभ्यास करत असताना प्रत्यक्षात अनुभवाचा पुरावा पाहिजे. शास्त्रज्ञांनी काढलेल्या अनुमानांना येथे महत्त्व नाही. किंवा शास्त्रांनी सांगितलेले विचार घ्यायचे असतील तर ते प्रत्यक्षात अनुभवांनी सिध्द झाले पाहिजेत. स्वतः अनुभव घेतल्या वाचून बोलत सुटणे हे नुसते शब्द ज्ञान असल्याने कंटाळवाणे वाटते. त्यासाठी समर्थ एक ऊदा आपल्याला देतात ते असे की, तोंडाचा 'आ'करून एखादे कुत्रे रडले तर जसे आपल्याला ऐकवत नाही ते रडते म्हणून मन बेचैन होते त्याच प्रमाणे कोरडे शब्द ज्ञान हे देखील मनाचा ठाव घेऊ शकत नाही. त्यात कोणतेही ज्ञान मिळत नाही. ज्या बोलण्यामध्ये अनुभवाच्या नावाने शुन्य असते ते बोलणे ऐकण्यात काही अर्थ नसतो. ऊदा,ज्या समुहामध्ये सगळेच आंधळे आहेत तेथे एकट्या डोळस माणसाचे कोणीही ऐकत नाही. त्याच प्रमाणे जेथे स्वानुभवाने ज्ञाननेत्र नाहीत तेथे स्वरूपामध्ये सगळा अंधार दिसुन येतो. देहबुद्धी ची माणसं स्वरूपाच्या बाबतीत आंधळी असतात.त्यांना स्वरूप वर्णन समजणे व पटणे अवघड असते.

## वासनेचे प्राबल्य

आधुनिक केसरी

माझ्या निरूपणाचा तुम्हांस विसर पडतो म्हणूनच बरे आहे. एखादी गोष्ट चांगली आहे आणि ती मिळाली तर सुखप्रद होईल ह्या गोष्टीची आठवण असूनही आपण ती मिळविण्यासाठी प्रयत्न करीत नाही हे अगदी अयोग्य आहे. हे पापच आहे. जर आपल्याला समजलेच नाही तर ते न करण्यात पाप नाही, परंतु समजूनही न करण्यात अत्यंत पाप आहे. खरे म्हणजे, प्रयत्न करणे हे आपल्या हातात आहे. आपण ऐकतो की, अंतकाळी जी मती तीच गती. मृत्युसमयी जशी वासना धरावी त्याप्रमाणे आपल्याला पुनर्जन्म प्राप्त होतो; तेव्हा वासनेतच आपला जन्म आणि वासनेतच आपला अंत, असे असताना तिला दूर कशी करता येईल ? एखादा मनुष्य काळा असेल तर त्याला आपले काळेपण काही घालवता येत नाही; त्याप्रमाणे वासना असणे हा मनुष्याचा एक सहज-गुण आहे, तो त्याला पालटता येत नाही. तर मग आम्हाला वासनेतून कधीच मुक्त होता येणार नाही का ? मनुष्याच्या ठिकाणी इतर प्राणिमात्रांपेक्षा जर काही वेगळे असेल तर चांगले काय आणि वाईट काय हे कळण्याची बुद्धी. आपण कळून सवरूनही



वासनेला, अहंपणाला आधार देतो, इथेच आपले चुकते. आपला अहंपणा इतका खोल गेलेला आहे की, आपल्याला हे सर्व माझेच वाटते : माझी बायको, माझी मुले, माझे घर. माझे माझे म्हणून किती सांगावे ! त्या माझेपणामुळेच अहंभाव वाढीला लागून, सर्व काही आपल्या मनाजोगते, आपल्याला सुख देणारे, हवेसे वाटू लागते आणि दुःख अगदी नकोसे वाटते. अर्थात् जगात कोणालाच नुसते सुख मिळत नाही. असे असूनही अहंपणाला बळी पडून सुखाच्या लालचीने मनुष्य मरेपर्यंत बरीवाईट कृत्ये करीत असतो, आणि त्याप्रमाणे त्याची वासना बनत जाते.

वासना म्हणजे अभिमान, म्हणजेच मीपणा. अशा रीतीने अहंपणाच जर वासनेचे मूळ अधिष्ठान आहे, तर तो नको का घालवायला ? खरोखरच, मनुष्याचा अहंपणा इतका खोल मुरलेला आहे की, त्याचे निर्मूलन करायला तसेच सूक्ष्म अस्त्र पाहिजे. नामाइतके प्रभावी आणि सूक्ष्म अस्त्र दुसरे कोणतेच नाही. ते परमेश्वराच्या अगदी जवळचे आहे. परंतु एवढे असूनही आपण ते आवडीने, निष्ठेने घेत नाही. आम्हांला सर्व काही समजते, परंतु नामस्मरण करण्याचा आळस आपल्यात भरलेला आहे; भगवंत कर्ता आहे असे अनुसंधान जो रात्रंदिवस ठेवील त्याचाच अहंकार जाईल हे ध्यानात ठेवून आपण भगवंताचे नाम घ्यावे. मनाने भगवंताचे होणे हे भक्तीचे मर्म आहे. आपल्याला जे पाहिजे ते त्याच्याजवळ मागावे. मागितलेली वस्तू भगवंत देईल किंवा न देईल. वस्तू दिली तर बरेच झाले, पण आपण मागितलेली वस्तू भगवंताने दिली नाही तर ती देणे आपल्या हिताचे नव्हते असे खरे मनापासून वाटावे. ही भावना वाढण्यासाठी, भगवंत दाता आहे असे लक्षात ठेवून शक्य तितके त्याचे नामस्मरण करावे. **६६. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २१ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# धुळे महानगर पालिकेत भ्रष्टाचाराचा कळस

## देवपुरातील एकाच रस्त्याचे तीन वेळा टेंडर, दोन वेळा बिल तयार

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** महानगरपालिकेत भ्रष्टाचाराने कळस गाठला असून, शासनाचा कोट्यावधी रुपयांचा विकास कामांच्या नावाखाली स्वतःची घरे व खिसे भरण्यासाठी खर्च केला जात आहे. देशातील भ्रष्टाचाराच्या अनेक मोठ-मोठ्या घोटाळ्यांनाही लाजवेल असा भ्रष्टाचार सध्या धुळे महानगरपालिकेत सुरु आहे असा आरोप ह्या निवेदनात करण्यात आला.

या भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्याचे काम शासनाचे प्रतिनिधी म्हणून आपले असून आपल्या आशीर्वादाने हा भ्रष्टाचार सुरु आहे की काय अशी शंका खुद्द धुळेकर आता उपस्थित करु लागले आहेत.

देवपूरातील सावता बिल्डींग मटेरियल-तिरुपती नगर ते डायव्हर्शन रोड या रस्त्याचे सतत तीन वेळा इस्टीमेट बनविण्यात आले असून सुरुवातीला महापालिका फंडातून या कामाचे इस्टीमेट 37 लाख इतके बनविण्यात आले नंतर ह्याच कामाचे नगरोत्थान योजनेतून 80 लाखाचे इस्टीमेट बनविण्यात आले, मनपा फंडाचे 37 लाख व नगरोत्थानाचे 80 लाखाच्या इस्टीमेटमध्ये रस्त्याचे अंतर तेवढेच होते. मनपा फंडातून हा रस्ता 6 मीटर 800 मीटर इतका टाकण्यात आला होता. त्यात 300I चझच व बाकी इच इउ लेअर घेतले आहेत. पुन्हा याच रस्त्यावर परत नगरोत्थान योजनेतून 900 मीटर अंतरासाठी 80 लाखांचे इस्टीमेट बनविण्यात आले व काम करतेवेळी मनपा फंडातून 300I चझच पूर्ण करण्यात आले यात इच इउ दोन लेअर नगरोत्थानमधून टाकून काम पूर्ण केल्याचे दाखविण्यात आले. त्यात इच चा लेअर फक्त 20II टाकण्यात आला. तर इउ लेअर फक्त 6 II टाकण्यात आला. या एकाच रस्त्यावर पहिले काम 37 लाखांचे नंतर 80 लाखांचे नगरोत्थान मधून, यात फक्त 30 लाखांपर्यंतच काम या रस्त्याचे झालेले आहे म्हणजे एकूण 1 कोटी 17 लाखांपैकी 30 लाखांचे काम उर्वरीत 80 लाख परत आता नव्याने टाकलेले 80 लाख असे 1 कोटी 60 लाख रुपये इतका भ्रष्टाचार या एकाच रस्त्याच्या कामात मनपाकडून होत असून इतर हजारो कोटींच्या रस्ते कामात किती भ्रष्टाचार झाला आहे, याची प्रचिती येते. या भ्रष्टाचाराला मनपातील अभियंते, बांधकाम विभाग व स्वतः आपण देखील जबाबदार आहात. महाराष्ट्र राज्य शासनाचा धुळे शहर विकासावर उपलब्ध झालेला पैसा अशा प्रकारे मनपातील अधिकारी, ठेकेदारांच्या खिशात जात असेल तर शिवसेना स्वस्थ बसणार नाही याची आपण नोंद घ्यावी.

वरील रस्ते कामाची युध्दपातळीवर चौकशी करुन तात्काळ ठेकेदाराचे बिल थांबविण्यात येऊन दोषीवर कार्यवाही करावी. आठ दिवसांच्या आत कार्यवाहीचा अहवाल प्रकाशित करावा. अन्यथा शिवसेना मनपा प्रशासनाच्या भ्रष्टाचाराविरोधात जनआंदोलन छेडेल याची आपण नोंद घ्यावी असे निवेदन शिवसेनेच्या माध्यमातून जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे महानगर प्रमुख धीरज पाटील डॉ. सुशील महाजन, भरत मोरे, मच्छिंद्र निकम, संदीप चव्हाण, शिवाजी शिरसाळे, कपिल लिंगायत, अमजद पठाण, मनोज शिंदे संतोष शर्मा, सागर निकम, विकास शिंगाडे,सागर साळवे नितीन जगताप, अजय चौधरी, आरिफ शेख, नितीन जडे सोनार, संदिप चौधरी, योगेश पाटील, गुलाब धोबी, नाना पारधी आदीं उपस्थित होते.

## दीड एकरात साकारली शिवरायांची प्रतिमा

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** छत्रपति शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटात सपन्न झाली. सोनई शहरातील अनेक विद्यालयतील विद्यार्थी यांनी विविध वेशभूषा परिधान करुन मिर्वानुकिने, सांस्कृतिक कार्यक्रमने सागता करण्यात आली. यशवंत सामाजिक प्रतिष्ठान आयोजित आ.शंकारराव गडाख यांच्या मार्गदर्शनखली, युवा नेते उदयन गडाख व ज्यांच्या पुढकराने शिवजयंती सोहळाचे आयोजन केले ते जिल्हा परिषद सदस्य सुनील गडाख यांच्या उपस्थित शिवभकतानी ढ़ोल, ताशाच्या, डीजेच्या तालावार साजरी करण्यात अली.

दिड एकर शेत जमीनिवार रांगोळीने साकारलेली प्रतिमा पहनयासाठी शिवभाकतानी मोठी गर्दी केली होती. शनिशिंगनापुर येथील छत्रपती संभाजी चौकात प्रतिमेचे पूजन करुन शिवप्रेमीनी वेशभूषा परिधान करुन शिस्तबद्ध मिरवनुक काढली होती.

सोनई व परिसरात शिवजयंती साजरी होताना पुतल्याला फुलाची सजावट, पुष्पहार घालून जय घोश करण्यात आला.

## फसव्या सरकारकडून मराठा समाजाची पुन्हा फसवणूक : वडेट्टीवारांची सरकारवर टीका

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महायुती सरकारने विशेष अधिवेशनाचा फार्स करून मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात 10 टक्के आरक्षण दिले. हे आरक्षण न्यायालयात टिकणारे नाही. त्यामुळे फसव्या सरकारने मराठा समाजाची पुन्हा फसवणूक केली असल्याची प्रतिक्रीया विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. सरकारचे पितळ उघडे पडेल म्हणून आज सभागृहात विरोधी पक्षाच्या नेत्यांना बोलू दिले नसल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने कितीही ढोल वाजवले, उर बडवले तरी आंदोलनकर्त्यांमध्ये सरकारने फसवल्याची भावना आहे. हे या सरकारचे अपयश आहे. महायुतीचे सरकार हे फसवे सरकार आहे. हे मराठा समाजाच्या आता लक्षात आले आहे. दोन वेळा न्यायालयात न टिकलेले आरक्षण पुन्हा या महायुती सरकारने दिले आहे. केवळ लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन केलेला फार्स म्हणजे मराठा समाजाच्या तोंडाला पाने पुसल्याचा प्रकार आहे. तेलही नाही आणि तुपही नाही आमच्या मराठा समाज बांधवांच्या हाती या महायुती सरकारने फक्त धुपाटणे दिले आहे. निवडणुकीच्या तोंडावर केवळ मतं मिळवण्यासाठी सरकारने ही नौटंकी केली आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, अशी काँग्रेस पक्षाची आणि माझी भूमीका मी वेळोवेळी मांडली आहे. 10 टक्के आरक्षण कोणत्याही आधाराशिवाय दिले आहे. त्यामुळे हे आरक्षण न्यायालयात टिकणार नाही. या महायुती सरकारमुळे मराठा समाजाचा पुन्हा भ्रमनिरास होणार असल्याचे श्री. वडेट्टीवार यांनी आज स्पष्ट केले. महायुतीचे सरकार बळीराजाची फसगत करणारं फसवं सरकार आहे. बेरोजगार युवक-युवतींची फसगत करणारं फसवं सरकार आहे. परीक्षार्थी उमेदवारांची फसगत करणारं फसवं सरकार आहे. जुमलेबाजी करणारं जुमलेबाज सरकार आहे. मलिदा खाणारं फसवं सरकार आहे. गॅरेंटीच्या नावाखाली फसगत करणार नो गॅरेंटी सरकार आहे. आता आरक्षण प्रश्नी फसगत करणारं फसवं सरकार म्हणून नवी ओळख या सरकारला मिळाली आहे. अशा शब्दात वडेट्टीवार यांनी हल्लाबोल केला आहे.

## महिलांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** खडकी सदार येथे महिलांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली आहे. यावेळी गावातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

यावेळी रुपाली सदार, किरण सदार, आरती सदार, पुनम सदार, इंदुबाई सदार, मुक्ता सदार, शितल सदार, लताबाई सदार, संगीता सदार, गिताबाई सदार यावेळी उपस्थित होते.

यावेळी आरती सदार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, महिलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच काही महिलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर केला. यावेळी आरती सदार म्हणाले की, समाजात राहत असताना आपण छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आचरणात आणले पाहिजेत. तसेच आपल्या मुलांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे बाळकडू पाजले पाहिले, समाजात वावरत असताना सर्वात आधी लहान मुलांना आपल्या आई कडून चांगले संस्कार मिळाले पाहिजेत. शिवाजी महाराज घडवण्यात सगळ्यात मोठा वाटा राजमाता जिजाऊ यांचा होता त्याचप्रमाणे आपण सुद्धा आपल्या मुलांना घरामध्ये तशी शिकवण द्यावी असे म्हणाल्या.

# मुफ्ती सलमान अझहरी यांच्या अटकेचा निषेध

## बोरी-कौसडी येथील समस्त मुस्लिम समाजाचे राष्ट्रपतींना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

नेमीनाथ जैन



बोरी : जिंतूर तालुक्यातील बोरी येथे समस्त मुस्लिम समाजाकडून हजरत मौलाना मुफ्ती सलमान अझहरी यांच्या अटकेचा निषेध करून मूक मोर्चा काढण्यात आला. दि. 20 फेब्रुवारी मंगळवार रोजी सकाळी दहा वाजता बोरी कौसडी येथील समस्त मुस्लिम समाजाकडून बोरी येथील कौसडी फाटा ते पोलीस ठाणे पर्यंत हजरत मौलाना मुक्ती सलमान अझहरी यांच्या अटकेचा निषेध करत मूक मोर्चा काढून त्यांच्या सुटकेसाठी पोलीस प्रशासनामार्फत राष्ट्रपतींना निवेदन देऊन मागणी करण्यात आली. दिनांक 31 जानेवारी रोजी हजरत मौलाना मुफ्ती सलमान अझहरी यांना गुजरात एटीएस कडून अटक करण्यात आली आहे. मुफ्ती सलमान अझहरी हे समाजाला संबोधित करीत असताना आपल्या भाषणात एका उपमेचा वापर करून शेरोशायरी केली होती. त्यात त्यांनी कोणत्याही धर्म अथवा समाज किंवा पक्ष तसेच कोणत्याही व्यक्तीचा नावाचा उल्लेख केलेला नाही असे असताना जाणीवपूर्वक मुस्लिम समाजाला भयभीत करण्याच्या हेतूने केंद्र व गुजरात सरकारच्या आदेशाने एटीएस ने मुफ्ती सलमान अझहरी व आयोजक मोहम्मद युसुफ मलिक, अजीम हबीब वडेदार यांना बेकायदेशीर रित्या अटक केली आहे. मुफ्ती सलमान अझहरी यांच्यावर लावण्यात आलेले खोटे गुन्हे मागे घेऊन त्यांची तात्काळ सुटका करावी या मागणीसाठी देशभरात मुस्लिम समाजाकडून आंदोलने करून केंद्र व गुजरात तसेच महाराष्ट्र सरकारचा निषेध करण्यात येत आहे. सध्या देशभरात मुस्लिम समाजाला टारगेट केले जात आहे गोवंशच्या नावाने तर कधी श्री रामांच्या नावाने तसेच लव्ह जिहादचा मुद्दा पुढे करून मॉ-ब्लेचिंग केली जात आहे. संविधानानुसार मुस्लिम समाजाला या देशात वावरण्याचा पूर्णत्व अधिकार आहे. असे असताना देखील मुस्लिम समाजावर अन्याय केला जात आहे. मुस्लिम समाजातील धर्मगुरूंना तसेच समाजातील इतर नागरिकांना कोणतेही कारण दाखवून अटक केली जात आहे. यामुळे भारत देशातला मुस्लिम समाज भयभीत झाला आहे. असे प्रकार तात्काळ बंद झाले पाहिजे. मुस्लिम धर्मगुरू हजरत मौलाना मुफ्ती सलमान तसेच आयोजकावरील लावण्यात आलेले खोटे गुन्हे मागे घेऊन त्यांची तात्काळ सुटका करावी या मागणीसाठी मूक मोर्चा काढून पोलीस प्रशासनामार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. हे निवेदन सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांनी मुस्लिम समाजाकडून स्वीकारून तुमच्या मागण्या राष्ट्रपती पर्यंत पोहोचवू असे आश्वासन दिले. दिलेल्या निवेदनावर मु.अब्दुल हाक अन्सारी, मौ.अब्दुल मकसूद, मौ.राशद रजा, मौ.इम्तेखाब, मौ.उस्मान, मौ.सलाम, मौ.कलीम, मौ.इलाही, मौ.मोईन, मौ.शकील, मौ. अखलाक, उपसरपंच शेख रफिक, ह.टि.सु.यु.मंचचे जि.उपाध्यक्ष शेख इरफान, शेख सोहेल, शेख वसीम, शेख बिलालोद्दिन यांच्या सह शेकडो मुस्लिम समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या.आहे

## राहुल गांधींना दिलासा

आधुनिक केसरी

विद्यमान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याविषयी आक्षेपार्ह टिप्पणी केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या मानहानीच्या एका खटल्यात काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. उत्तर प्रदेशमधील सुलतानपूर येथील जिल्हा न्यायालयाने हा निर्णय दिला असून २०१८ साली राहुल गांधींविरोधात याबाबत तक्रार करण्यात आली होती. न्यायालयाच्या या निर्णयाबाबत वकील तारकेश्वर सिंह यांनी अधिक माहिती दिली. “राहुल गांधी यांना मानहानीच्या या खटल्यात समन्स जारी करण्यात आले होते. समन्सनंतर राहुल गांधी कोर्टात हजर झाले होते. याआधी जामीन मिळावा यासाठी राहुल गांधी यांच्याकडून न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यानंतर हा जामीन मंजूर करण्यात आला आहे,” असे तारकेश्वर यांनी सांगितले. तक्रारदाराचे वकील संतोष पांडे यांनीदेखील या खटल्याबाबत अधिक माहिती दिली. “राहुल गांधी हे निरापराध असून, त्यांनी मानहानीकारक विधान केलेले नाही, असा दावा त्यांच्या वकिलांनी केला. त्यावर आम्ही आक्षेप घेतला. भारतीय दंड संहितेच्या कलम ५०० अंतर्गत त्यांचा गुन्हा हा जामीनपात्र आहे. त्यामुळे त्यांना जामीन मंजूर करण्यात आला,” असे संतोष पांडे यांनी सांगितले. भाजपाचे नेते विजय मिश्रा यांनी ४ ऑगस्ट २०१८ रोजी राहुल गांधींविरोधात मानहानीची तक्रार दाखल केली होती. मुंबईतील सीबीआयच्या विशेष न्यायालयाने २००५ सालच्या बनावट एन्काऊंटर प्रकरणात अमित शाहांना दोषमुक्त केले होते. या प्रकरणादरम्यान अमित शाह हे गुजरातचे गृहमंत्री होते. त्याच्या चार वर्षांनी राहुल गांधी बंगळुरू येथे एका पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी अमित शाहांवर एक विधान केले होते. हेच विधान मानहानीकारक असल्याचा दावा मिश्रा यांनी केला होता. त्यानंतर त्यांनी राहुल गांधींविरोधात मानहानीची तक्रार दाखल केली होती. या खटल्यासंदर्भात आता राहुल गांधी यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.

## आध्यात्मिक राष्ट्रवादाचे प्रणेते : गोळवलकर गुरुजी




डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**मानवेंद्रनाथ रॉय यांनी बुद्धी आणि प्रेरणा या क्रांतीचा आधार असतात असे म्हटले होते. कार्ल मार्क्सच्या मते, विचारांचे दारिद्य हे सर्वात भयावह असते. गुरुजींनी भारतातील बुद्धिवंतांच्या विचार दारिद्यावर मात करून आध्यात्मिक राष्ट्रवादाचे नवे प्रमेय मांडले. गुरुजींच्या जीवनकार्याचा वेध घेतला असता असे दिसते की, रामकृष्ण मिशनच्या तालमीत तयार झालेले आध्यात्मिक महापुरुष होते. त्यांची स्वप्ने साकार होण्याचा सुवर्णकाळ समीप आला आहे.**

**प्रस्तावना :** “हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व” हे सूत्र घेऊन प. पू. डॉ. केशव बळिराम हेडगेवार यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नागपूर येथे मोहिते मळ्यात स्थापना केली. आज संघाच्या कार्याचा वटवृक्ष झाला आहे. जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था म्हणून संघाने नांवलौकिक संपादन केला आहे. संघाच्या या विराट लोकजागृती कार्यात दुसरे सरसंघचालक या नात्याने परमपूज्य गोळवलकर गुरुजींचे स्थान अत्यंत वंदनीय व आदरणीय आहे. संघ परिवारात श्री गुरुजी म्हणून सुपरिचित असलेल्या माधव सदाशिव गोळवलकर यांचे वर्णन भारतीय अध्यात्मिक राष्ट्रवादाचे संस्थापक असे करत येईल. त्यांनी आपल्या आयुष्यातील तन-मन-धन समर्पित करून ते भारतमातेच्या चरणी अर्पण केले. अध्यात्मिक राष्ट्रवादाला सैधांतिक बैठक प्राप्त करून देण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. त्यांच्या अनुयायातच नव्हे तर त्यांच्या विरोधकाकडूनसुद्धा त्यांच्या कार्याची थोरवी मान्य केली जाते. “इंडिया आफ्टर गांधी" या ग्रंथाचे लेखक लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिकलेले प्रा. डॉ. रामचंद्र गुहा यांनी गुरू गोळवलकर या नावाचे एक स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे आणि त्यामध्ये महात्मा गांधी नंतर भारतीय समाज जीवनावर व विशेषतः तरूण वर्गावर आपल्या सिद्धांतांचा विलक्षण प्रभाव टाकणारे आदर्श व्यक्तिमत्व असे वर्णन केले आहे. २१ जून १९४० ते ५ जून १९७३ पर्यंत सुमारे ३३ वर्षे म्हणजे तीन दशके सरसंघचालक या नात्याने त्यांनी संघटनेवर आपल्या विचारांचा व कार्यप्रणालीचा विलक्षण प्रभाव टाकला.

**प्रारंभिक जीवनातील संघर्ष :** माधव सदाशिव गोळवलकर यांचे प्रारंभिक जीवन हे अनेक घटना व घडामोडींनी युक्त असून त्यांच्या जीवनातील बदलते प्रवाह (टर्निंग पॉईंट) समजून घेतले असता असे दिसते की, मध्यमवर्गीय सुसंस्कृत कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबात त्यांचा जन्म झाला. नागपूर जवळील कालिदासाची कर्मभूमी असलेल्या रामटेक येथे त्यांचे बालपण गेले. लौकिक अर्थाने त्यांचे कुटुंब सुखी होते. त्यांच्या अभ्यासात आणि ज्ञानसाधनेत त्यांच्या वडिलांनी सदैव प्रोत्साहन दिले. पोस्ट आणि तार विभागात त्यांच्या वडिलांनी प्रारंभी लिपिक म्हणून काम केले होते. पुढे ते मध्य प्रांत आणि विदर्भ राज्यात शिक्षक या पदावर सेवा करू लागले. तद्नंतर ते प्रशालेचे मुख्याध्यापक म्हणून कार्य करू लागले. त्यांनी अध्ययन अध्यापन व विस्ताराचे उत्कृष्ट कार्य करून शेवटी मुख्याध्यापक या नात्याने आपल्या शिस्त व कुशल प्रशासनामुळे शिक्षण खात्यावर चांगली छाप टाकली. माधवराव गोळवलकर हे नऊ भावंडांपैकी एकुलते एक सुपूत्र होते. त्यामुळे त्यांच्या वडिलांनी देशभक्ती, समाजसेवा या मूल्यांचा त्यांच्यावर सतत संस्कार केला. वडिलांच्या मध्य भारतात वारंवार बदल्या





होत असत. त्यामुळे माधवरावांनाही अनेक शाळांमध्ये शिक्षण घ्यावे लागले. त्यांचा कल शालेय जीवनापासून विज्ञानाकडे होता. एका बाजूला पदार्थविज्ञान आणि जीवशास्त्र तर दुसऱ्या बाजूला धर्माचे विज्ञान म्हणून त्यांना अध्यात्माविषयीही रुची होती. शालेय जीवनात असताना त्यांनी विज्ञानाचा सखोल अभ्यास सुरू केला आणि त्यांना पडलेले बिकट प्रश्न आपल्या गुरुजनांना विचारून ते त्यांची उत्तरे मिळवीत असत. विद्यार्थीदशेत शाळेमध्ये ते अत्यंत उत्साही, कार्यक्षम आणि तेवढेच बुद्धिमान तरूण होते. पौगंडावस्थेत त्यांना धर्म, अध्यात्मिक ध्यान साधना, योग या विषयी सखोल जिज्ञासा निर्माण झाली. त्यापोटी त्यांनी धर्म व अध्यात्मावरील अनेक मराठी ग्रंथ वाचनाचा सपाटा लावला. श्री. चं. प. भिशीकर यांनी गुरुजींचे चरित्र लिहिले आहे. या चरित्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, श्री गुरुजींचा अध्यात्मिक पिंड या काळात जोपासला गेला. वेद, गीता, उपनिषदे, श्रुती, स्मृती, संहिता, वेदांगे, पुराण वाङ्मय यांचे वाचन करून ते अध्यात्मिक प्रश्नांविषयी चिंतन करू लागले. यातूनच त्यांच्या असे लक्षात आले की, धर्म आणि अध्यात्म हा भारतीय राष्ट्रवादाचा आत्मा आहे. शालेय जीवनातील त्यांचा विज्ञानाकडे असलेला ओढा पुढे चालून बनारस हिंदू विद्यापीठात त्यांनी जैव विज्ञान विद्याशाखेत प्रवेश घेऊन त्यातील श्रेष्ठ पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला.

**उच्च शिक्षणातील भरारी :** शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी नागपूरमधील हिस्लॉप कॉलेजमध्ये विज्ञान विद्याशाखेत प्रवेश घेतला. हे महाविद्यालय ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चालविलेले शैक्षणिक केंद्र होते. तेथे ख्रिश्चन धर्म व तत्सम विचारप्रणालीचा पुरस्कार केला जात असे. हिंदू धर्माच्या अपमानाचे अनेक प्रसंग तेथे येऊ लागले. त्यामुळे ते बऱ्याच वेळा संतप्त होत असत, रागावत असत. परंतु त्यांनी विवेक कधीही सोडला नाही. हिंदू धर्माच्या रक्षणाविषयी आपण सेवाभावीदृष्टीने काहीतरी कार्य करून त्यांना उत्तर दिले पाहिजे असा विचार त्यांच्या मनात डोकावू लागला. चिंता आणि चिंतन तसेच नित्य अनुभवातून त्यांना अनेक प्रश्न पडू लागले व त्यातून या प्रश्नांची उत्तरे ते शोधू लागले. या विचारमंथनात त्यांच्या मनामध्ये अध्यात्मिक राष्ट्रवादाचे बीज रोवले गेले. पुढे त्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी महामना पं. मदनमोहन मालवीय यांनी स्थापन केलेल्या बनारस हिंदू विद्यापीठात प्रवेश घेतला. हिस्लॉप कॉलेज सोडले आणि त्यांना त्यांचा कोंडलेला श्वास मुक्त झाला. बनारस हिंदू विद्यापीठाच्या मुक्त प्रांगणात त्यांनी नवीन गगनभरारी घेतली. तेथे पदव्युत्तर शिक्षण घेताना ते बी. ए. च्या मुलांना शिकवू लागले. त्यांचा विषय जैव विज्ञान असला तरी ते तेथील तरुणांना राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र इ. विषयांत मार्गदर्शन करू लागले. त्यामुळे ते गुरुजी नावाने ओळखले जाऊ लागले. १९२७ साली त्यांनी विज्ञानाची पदवी व १९२९ साली जीवशास्त्रामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर मदनमोहन मालवीय यांच्या वैचारिक प्रभावातून ते हिंदुत्वावर चिंतन करू लागले. पं. मदनमोहन मालवीय हे त्या काळात या विद्यापीठाचे संस्थापक होते तसेच हिंदू महासभेचे व राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते. पं. मदनमोहन मालवीय यांच्या उक्ती व कृतीचा त्यांच्या मनावर पडलेला प्रभाव विलक्षण होता. बनारसमध्ये शिकत असताना ते संघशाखेवर नियमित जाऊ लागले आणि त्यांना संघाच्या रचना व कार्यपद्धतीची सखोल ओळख झाली.

त्यांना जैव विज्ञानात विलक्षण गती होती. त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठात तीन वर्षे प्राणीशास्त्र विभागात अधिव्याख्याता म्हणून उत्तम प्रकारे काम बजावले. आपण सागरी जीवशास्त्र म्हणजे मरीन बायोलॉजी या विषयात डॉक्टरेट पदवीसाठी संशोधन करावे असे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी ते चेन्नईलाही गेले. त्या संस्थेतील कार्यपद्धती समजावून घेतली. आता नाव नोंदवणार एवढ्यात त्यांचे वडील सरकारी सेवेतून निवृत्त झाले. त्यामुळे माधवरावांना डॉक्टरेटच्या अभ्यासक्रमात प्रवेश घेणे शक्य झाले नाही. कारण पुढे चालून नियतीने त्यांच्यावर साऱ्या देशाच्या जैवशास्त्राचा अभ्यास करून देशाची प्रकृती सुधारण्यावर अधिक भर द्यावा लागला.

**श्री गुरुजी लोकउपाधी :** बनारस हिंदू विद्यापीठात शिकत असताना व शिकवीत असताना तेथील विद्यार्थी त्यांना श्री गुरुजी या नावाने ओळखत असत. त्याचे कारण म्हणजे त्यांची संन्याशासारखी वाढलेली दाढी, लांब केस आणि साधी स्वच्छ वस्त्र परिधान करण्याची त्यांची पद्धती यामुळे ते श्री गुरुजी या उपाधीस सार्थ व्यवहार करत होते. या काळात बनारसमध्ये असताना ते संघकार्यात सक्रिय झाले. तेथे त्यांचे अनुयायी त्यांना आदराने श्री गुरुजी असे संबोधू लागले. एकानंतर एक संघातील दायित्व त्यांनी समर्थपणे पार पाडले. प्रथम मुख्य शिक्षक, बौद्धिक प्रमुख, संघटक, प्रचारक अशी अनेक कार्ये ते झपाट्याने पार पाडत असत. शिक्षणानंतर ते नागपुरात परतले. आणि १९३७ साली त्यांनी पूजनीय डॉक्टरांच्या आग्रहाने कायद्याची पदवी प्राप्त केली. बनारस हिंदू विद्यापीठाच्या परिसरात व्याख्याने देत असताना, बौद्धिक योगदान देताना त्यांचा संघकार्यकर्ते श्री. भैय्याजी दाणी तसेच सरसंघचालक केशव बळिराम हेडगेवार यांचाही परिचय झाला. भैय्याजी दाणी हे पूजनीय डॉक्टरांचे समीपचे सहकारी होते. भैय्याजी दाणी यांनीच बनारस शहरात संघाच्या अनेक शाखा स्थापन केल्या होत्या. पं. डॉ. मदनमोहन मालवीय यांनी संघकार्यास प्रोत्साहन दिले होते.

**यशाचा चढता आलेख :** संघात श्री गुरुजींनी पाऊल टाकले ते एक साधा स्वयंसेवक म्हणून. स्वयंसेवक ते सरसंघचालक असा त्यांचा प्रवास विलक्षण होता. यशाचा चढता आलेख त्यांच्या जीवनातील लौकिक अर्थाने त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष पटवितो. श्री. गोळवलकर यांनी बनारसमध्ये असताना संघाच्या कार्याचे जवळून अवलोकन केले. सभा, संमेलनांना ते उत्साहाने उपस्थित राहत. संघातील अधिकारी व्यक्तींनी त्यांचा उत्साह पाहून त्यांना सतत प्रोत्साहन दिले.

## महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची पुण्यतिथी आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.**

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता. कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाक्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बिनधास्तपणे पेपर द्या; निकालाची चिंता करू नका

आधुनिक केसरी

**मित्र-मैत्रिणींनो नमस्कार.**

**सर्वप्रथम आजपासून सुरू होणाऱ्या परीक्षांसाठी आधुनिक केसरी परिवारातर्फे तुम्हाला अगदी मनःपूर्वक शुभेच्छा. या परीक्षा तुम्हाला घवघवीत यश देतील आणि या परीक्षेत तुम्ही यशस्वी होऊन आयुष्याच्या पुढील प्रवासाला तितक्याच आनंदात सुरुवात कराल यात शंकाच नाही. त्यासाठी सगळ्यांचेच आशीर्वाद आणि शुभेच्छा तुमच्या सोबत आहेत. पण मित्रांनो, एक लक्षात घ्या की पेपरला जाताना कुठलंही टेन्शन डोक्यावर न ठेवता, मनात न ठेवता अगदी बिनधास्तपणे पेपर ला जा आणि शांत डोक्याने पेपर सोडवा. निकालाची चिंता आज करू नका. सगळ्याच शाळांमध्ये दहावी, बारावीच्या टेस्ट सिरीज तुम्ही सोडवलेले आहेत, प्रश्नपत्रिका सोडवण्याचा तुमचा सराव झालेला आहे, कोणत्या प्रश्नाला किती वेळ द्यायचा ? कोणता प्रश्न लवकर सोडवायचा ? कोणत्या प्रश्नाला मागे टाकायचं ? उत्तर कसे लिहायचे ? हे सगळं तुम्हाला तुमच्या शिक्षकांनी सांगितलेल आहेच. शिवाय तुमचा अभ्यासही आता पूर्ण झालेला आहे. त्यामुळे इथून पुढे पेपरला जाताना फक्त एकदा डोळ्याखालून सगळं घाला. जो पॉईंट, जो मुद्दा तुम्हाला लक्षात आला नसेल समजला नसेल तेवढा पुन्हा एकदा पूर्ण वाचा. नसेल समजला त्या संबंधित विषयाच्या शिक्षकांना फोन करून किंवा त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करा आणि परीक्षा केंद्रावर जाताना मात्र शांत डोक्याने पोटात काहीतरी टाकून भरपूर पाणी पिऊनच परीक्षेला जा.**

मित्रांनो दहावी , बारावीच्या परीक्षेला प्रचंड महत्व दिलं जातं . आणि घरच्यांसोबतच बाहेरचेही दहावीचं वर्ष आहे ना निट अभ्यास कर , बारावीची परीक्षा आहे ना निट अभ्यास कर . असे सल्ले सगळे देत असतात. या दोन वर्षाच्या परीक्षा म्हणजे आयुष्यातील सगळ्यात महत्त्वाच्या परीक्षा आहेत असाच भाव , अशीच परिस्थिती सर्वत्र निर्माण करण्यात येते. परंतु मित्र मैत्रिणींनो एक गोष्ट कायम लक्षात असू द्या की , दहावी आणि बारावीची परीक्षा म्हणजे संपूर्ण आयुष्य नव्हे . यापूर्वी दहावी बारावीच्या परीक्षेमध्ये जे गुणवत्ता यादीत आलेले होते ते विद्यार्थी आज कुठे आहेत याचाही विचार करा. हे खरं की दहावी बारावीचे वर्ष आयुष्याला एक वेगळी दिशा देऊ शकतात . परंतु , या दोन परीक्षा म्हणजेच सर्वस्व , या दोन परीक्षा म्हणजेच आयुष्याची इतिशृती असं अजिबात समजू नका. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येकाने मेरिटमध्येच आलं पाहिजे हेही गरजेचं नाही. आपण प्रयत्न जरूर करा . गुणवत्ता यादीत येत असाल ,सर्वोत्तम मार्क मिळवीत असाल आणि ही परीक्षा पास करत असाल तर निश्चितच तुम्हाला आवडीच्या क्षेत्रात सहज संधी मिळत असते. परंतु , समजा या परीक्षांमध्ये मनासारखे मार्क्स मिळाले नाहीत किंवा, एखादा पेपर खराब गेला तर वाईट वाटून घेऊ नका. डोक्यात वेगळे विचार करू नका. आणि शांतपणे दुसऱ्या पेपरला तितक्याच आनंदाने आणि आत्मविश्वासाने सामोरे जा. मित्रांनो या परीक्षेत तुम्हाला घवघवीत यश मिळेलच यात शंकाच नाही. पण समजा, एखाद्या वेळेस कदाचित मिळाले नाही तर एकदम घाबरून न जाता काहीतरी चुकीचे निर्णय घेऊ नका. माझी पालकांनाही नम्र विनंती आहे की, आपल्या पाल्यांवर अति दबाव टाकू नका. त्यांना सातत्याने अभ्यासात गुंतवून ठेवू नका. ही परीक्षा आहे .सगळ्या परीक्षांसारखेच याही परीक्षेला त्यांना समोरच जाण्याचं बळ द्या . तुमच्या अपेक्षा, तुमच्या आशा , तुमची स्वप्न ही तुमच्या मुलाबाळांवर लादू नका . तसा प्रयत्नही करू नका .स्पर्धेचे युग आहे हे मान्य आहे. या युगात त्यांना यश मिळावं यासाठी तुम्ही धडपडत आहात हेही मान्य आहे. त्यासाठी तुम्ही परिश्रम घेत आहात ,मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करत आहात हेही मान्य आहे . परंतु म्हणून या स्पर्धेच्या काळात तो स्पर्धेतला घोडा होणार नाही याची मात्र काळजी घ्या . सतत दबाव त्यांच्यावर टाकू नका , त्यांना शांत डोक्यांनी त्यांचं भविष्य निवडू द्या .त्यांची आवड कशात आहे ? त्यांची इच्छा कशात आहे ? याचाही विचार त्यांच्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करा. आणि त्यांना शांतपणे परीक्षा केंद्रावर नेऊन सोडा. परीक्षा केंद्रावर सोडत असताना सुद्धा त्यांना सांगा की बेटा जसा जमेल तसा छान पेपर दे , तुझा अभ्यास नीट झालेला आहे , छान पेपर सोडव बस एवढंच सांगा. पेपर खराब गेला म्हणून त्यांच्यावर रागावू नका, चिडू नका. दुसऱ्या पेपर साठी त्यांना प्रोत्साहन द्या. दहावी बारावीच्या परीक्षा आल्या की विद्यार्थी प्रचंड तणावांमध्ये वावरताना दिसतो आणि एखादा पेपर चांगला गेला नाही तर घरच्यांच्या भीतीमुळे, धाकामुळे बरेचदा ही तरुणाई हे किशोरवयीन मुलं आपला जीव सुद्धा द्यायला मागेपुढे पाहत नाहीत, अशी परिस्थिती मात्र येऊ देऊ नका . मित्र मैत्रिणींनो हे लक्षात घ्या की ही परीक्षा म्हणजे सर्वस्व नव्हे . तुम्ही यशस्वी लोकांच्या कहाण्या जर वाचल्या तर असं लक्षात येईल की बरेचसे यशस्वी पुरुष , बरेचसे यशस्वी लोक हे त्यांच्या शालेय जीवनातील कोणत्यातरी परीक्षेत कधीतरी नापास झालेले आहेत . पण म्हणून त्यांनी खचून न जाता , आपलं ध्येय डोळ्यासमोर ठेवत आपली आवड ज्या विषयात आहे त्या विषयात आपलं करिअर करण्याचा प्रयत्न केला . आणि ज्या ठिकाणी त्यांना यश मिळालं नाही तिथे दुसरी बाजू स्वीकारत त्यांनी स्वतःला घडवण्याचा प्रयत्न केला. असे अनेक लोक जे दहावी बारावीच्या परीक्षेत नापास झालेत, असे अनेक लोक आज यशाच्या शिखरावर पोहोचलेले आहेत. म्हणून म तुम्हीही नापास व्हा अस मी म्हणणार नाही , तसा माझा उद्देशही नाही . पण अपयश आले म्हणून खचून जाऊ नका , एक पेपर खराब गेला म्हणून रडत बसू नका , त्याची चिंता करत बसू नका तर पुढे आणखी काहीतरी मी चांगलं करून दाखवेल हा विश्वास मनामध्ये निर्माण करा. त्यामुळे मित्र-मैत्रिणींनो ही एक सर्वसामान्य अशीच एक परीक्षा आहे ,सगळ्या परीक्षांसारखी परीक्षा म्हणून परीक्षा द्या . आणि बिनधास्तपणे पेपर ला जा, निकालाची चिंता आज अजिबात करू नका . निकालासाठी आणि निकाला नंतर आपण पुन्हा नव्याने भेटणार आहोतच. तुमच्या निकालापूर्वी आणि नंतर मी पुन्हा एकदा तुम्हाला आमच्याच वर्तमानपत्रातून मार्गदर्शन करेल. तोवर तुमच्या या दहावी बारावीच्या परीक्षेसाठी आधुनिक केसरीच्या संपूर्ण टीम कडून तुम्हाला मनःपूर्वक शुभेच्छा.



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568



# नाथजोगी समाजातील निराधार महिलांना न्याय केव्हा मिळणार?

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** राईनपाडा घटनेचा नुकताच निकाल लागला आहे आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सोबत पीडित मयत दुर्दैवी समाज बांधवांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व इतर शासकीय सुविधांचा लाभ मिळाला आहे त्या घटनेचा निकष कळमना नागपूर येथील तीन गरीब भिक्षेकरी दुर्दैवी समाज बांधवांची हत्या आणि एका समाज बांधवाला जबर मारहाणीत आलेले अपंगत्व आणि जीवनभराचा कायमचा विक्षिप्तपणा वाटेला आलेला असताना त्यांची उर्वरित कुटुंबीय आई-वडील लहान मुले काहींना तीन मुली आहेत कुठलेही रोजगाराचे साधन उपलब्ध नाही अशाप्रकारे आपल्या सासू-सासऱ्यांना आई-वडिलांना आपल्या चिल्यापिल्यांना त्या दुर्दैवी अभागी विधवा महिला कशा प्रकारे पालन पोषण करत असतील याचा थोडा तरी संवेदशील मन असलेल्या समाज बांधवांनी विचार केला आहे का सदर घटनेला आज बारा वर्षाचा काळ लोटलेला आहे सदर घटनेची केस अजून बोर्डवर देखील आलेली नाही किती हे त्या निष्पाप समाज बांधवांचे दुर्दैव आहे की स्वातंत्र्याच्या 70 वर्षानंतर ही गरीब भिक्षेकरी समाजाला भिक्षा मागणी शिवाय पर्याय ठेवला नाही शासन उदासीन आहे. महाराष्टात अनेक संघटना आहेत,अनेक नविन महासंघ निर्मान झाले आहेत तरी समाज बांधवाना न्याय मिळु शकत नाही. हे समाज संघटना समाज धुरीनांचे अपयश समजावे का ? बारा वर्ष एक तपपुर्ती झालेली असतांना पिडीतांच्या महीला भगिणी आपला कुटूंबाता आधार हरवुन आज थंडीवार्यात उघड्यावर पाच दिवसांपांसुन उपोषणाला बसलेल्या असतांना कुणीही समाज बांधव त्यांना पाठिंबा दर्शवित नाहीत की एक शब्द लिहीणार नाहीत उपोषण स्थळी येवुण मोठ्या संख्येने गोळा होवुन लोक प्रतिनिधी आणी प्रशासन यांचे वर दबाव निर्माण करीत नाहीत तो पर्यत न्याय मिळणार नाही,राईनपाडा घटनेच्या निकाला नंतर दोन्ही महासंघाचे वरिष्ठ नेते मा.श्री डॉ नाथ नाथ जी साहेब व मा श्री चव्हाण नाथ जी साहेब यांनी ईतर समाज बांधवा समवेत मुंबई येथे एका व्यासपिठावर एकत्र येवुन सरकारी वकील मा श्री उज्वल निकम साहेबांचा सत्कार करून समाजाचे वतीने धन्यवाद देवुन त्यांचे आभार मानले आहेत. जर राईनपाडा घटनेत समाज बांधवांना न्याय मिळु शकतो तर कळमना नागपूर घटनेला ते सर्व निकष लागु पडतात तर त्या धर्तीवर या घटनेतील समाज भगिणीं का न्याय मिळु शकत नाही? का मिळणार नाही?का मिळवुन देता येनार नाही ? या गोष्टींचा विचार व्हावा.आणी बारा वर्षे झालीत आपण का न्याय मिळवुन देवु शकलो नाही याचाही विचार व्हावा. प्रशासकीय अधिकारी एस.डिएम साहेब मा श्री काळे साहेबांचे दालनात मा श्री भाऊलाल नाथजी बाबर सर व ईतर समाज बांधवा सोबत सदर आमरण उपोषणा बाबत भेट घेवुन चर्चा केली असता सदर पिडीतांना शासकिय निकषा नुसार मोबदला दिला आहे,(परंतू ( तो अत्यल्प आहे.)पुढे ते म्हणाले की त्यांना कुटूंबिया बाबत सहानुभुती असुन केवळ येथे बसुन प्रश्न मार्गी लागणार नाही मी माझी प्रशासकीय प्रक्रिया पुर्ण केली आहे.आणी पुढेही करीत राहील.आपण वरिष्ठ पातळी वरू पाठपुरावा करावा त्याने नक्कीच प्रश्न मार्गी लागु शकतो.

त्या नंतर स्थानिक आमदार मा श्री संजय जी कुटे साहेब यांचे निवासस्थानी भेट घेवुन त्यांना विनंती केली की आपण आमचे समाज शिष्ट मडळा सोबत बैठक घडवुनआणन्याठी राज्याचे माननिय मुख्यमंत्री माश्री शिंदे साहेब ग्रुहमंत्री माश्री फडणविस साहेब यांची भेट घेण्यासाठी वेळ मिळवुन देण्याचा प्रयत्न करावा अशी मी विनंती केली असता मा आमदार साहेबांनी स्पष्ट सांगीतले की बाबर सरांना कल्पना दिली आहे की माश्री फडणविस साहेबांसोबत या विषयी फोनवर चर्चा झाली आहे आणी ते या विषयी ग्रुहमंत्री महोदयांची भेट घेवुन सदर प्रकरणाची माहीती देणार आहेत.परंतु हे नेहनी तोंडोतोडीच सांगत आहेत.नाही तर बारा वर्ष यांनी का न्याय मिळवुन दिला नाही. केवळ मते मागतात आणी समाजाला वार्या वर सोडुन देतात हेच यातुन सिध्द होते.पुढे ते म्हणाले की सदर उपोषणात निवेदनात ईतर मुद्दे कशा करीता मांडले आहेत.यांचा काय संबध.आणी महीलांना येथे बसवुन त्यांना त्रास का देता,मग ईतर मुद्यांसाठी तुम्ही पण बसा त्यांचे सोबत. त्यांना भरपूर पैसा दिला.इंगळे साहेब आलेले आहेत यांचे हस्ते त्यांचे उपोषण सोडवा. कारण एव्हढ्या वर्षात ते न्षाय देवु शकले नाहीत आणी आता माजी मुख्यमंत्री माश्री उध्दवजी ठाकरे यांचा 22 तारखेला दौरा होत असुन ते उपोषण स्थळी भेट देणार आहेत.आणी यांचा नाकर्तेपणा उघडा पडुन यांची नाचक्की होण्याची यांना भिती वाटत आहे,म्हणुन ते उपोषण मागे घ्या असे म्हनत आहेत.तरी आपण न्याय मिळे पर्यंत सर्वांचे सहकार्याने उपोषण सुरूच ठेवणार आहोत.त्या करीता सर्व समाजाने एकजुट दाखवित उपोषण स्थळी मोठ्या संख्येने गोळा होवुन शासनास आपली ताकद दाखवुन द्यावी.दोनतिन दिवस व उध्दवजींच्या भेटी पर्यत उपोषण स्थळी जमायचे आहे असे मी जाहीर आवाहनाद्वापे आपणास हात जोडुन नम्र विनंती करीत आहे.माआमदार साहेबांनी बोलु न देता मुस्कटदाबीचा प्रयत्म केला आहे.जर न्याय मिळाला नाही तर संपुर्ण नाथ समादाला मते मागायला कोणीबी नेत्षांनी येवु नये,संपुर्ण नाथ समाज मतदानावर बहिष्कार टाकेल हे त्यांना ठासुन सांगण्याची वेळ आलेली आह.त्या शिवाय ते आपली दखल घेणार नाहीत हे लक्षाच घ्यावे.

# ब्ल्यू डायमंड स्कूलमध्ये शिवजयंती साजरी

## मिरवणूक अन् विद्यार्थ्यांचा शिवजागर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव, अशा प्रेरणादायी घोषणा देत लोणंद (ता.खंडाळा) येथील ब्ल्यु डायमंड इंग्लिश मिडीअम स्कूल मध्ये हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.हा अनोखा उपक्रम संपन्न होत असताना सुरुवातीला शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे आणि शाळेतील वाहन चालक तसेच शिक्षकवृंद यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. विद्यालयातून मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला.ही मिरवणूक लोणंद शहरातून घेऊन जात असताना एक वेगळा माहोल झालेला पाहायला मिळाला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारखी वेशभूषा साकारलेला इयत्ता चौथीतील अनुज कोळपे हा विद्यार्थी विशेष आकर्षणाचा केंद्र बिंदू ठरला होता.शिवजयंतीचे स्वरूप अगदी राजेशाही थाटातच करण्यात आले होते.हुबेहुब शिवराय बनलेल्या विद्यार्थ्याला घोड्यावर स्वार करत ज्या पद्धतीने शिवजयंतीची मिरवणूक काढण्यात आली होती.जणू हा सोहळा अनेकांच्या डोळ्याना प्रत्यक्ष अनुभवता आला.याबद्दल सुद्धा लोणंदकरांनी सुध्दा ब्ल्यु डायमंड स्कूलच्या या आयोजनाचे व सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केलेले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी मावळे बनत मिरवणूक सोहळ्यात एक नयन रम्य असे दृश्य निर्माण केलेले पाहायला मिळाले. संपूर्ण लोणंद शहरातून जय भवानी जय शिवाजी,हर हर महादेव असा जयघोष देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना सुद्धा एका वेगळ्या उपक्रमाची अनुभूती घेता आली. मिरवणूक लोणंद नगरपंचायत पटांगणात आल्यानंतर विद्यार्थ्यांकडून विविध उपक्रम घेण्यात आले.

यावेळी शिव विचारांचा आणि शिवकार्याचा जागर करण्यात आला. सुरुवातीला प्रास्ताविक शिक्षिका पौर्णिमा भंडारे यांनी केले.संध्या धायगुडे या विद्यार्थीनीने छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली.

विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या कार्याचे गोडवे गाणाऱ्या गाण्यावर नृत्य केले. तसेच लेझिम नृत्याचे सादरीकरण सुद्धा करण्यात आले.विद्यार्थी रुद्र यादव या चिमुकल्या विद्यार्थ्याने शिवकाव्य म्हटले. तर इयत्ता दुसरी तील विद्यार्थी अथर्व बिचुकले व वेदांत भोजने यांनी पोवाडा गायन केले.शिक्षिका गीतांजली दगडे यांनी आपल्या मनोगतातून शिवरायांच्या कार्यावर विशेष प्रकाशझोत टाकला. हा संपुर्ण कार्यक्रम पार पडत असताना अनेकांनी हा सोहळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. तसेच या परिसरातून ये जा करणारे अनेकजण विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहण्यासाठी काही क्षण थांबले होते. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थित असलेल्या लोकांनी त्यांना टाळ्यांचा कडकडाट करत प्रतिसाद दिला.कार्यक्रमाच्या सरते शेवटी प्रियांका गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.यावेळी मराठा समाज मंडळाने विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणा बद्दल विशेष कौतुक केले.मराठा समाज मंडळाने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. याबद्दल शालेय प्रशासनाने सुद्धा मराठा समाज मंडळाचे आभार मानले.मिरवणुकी दरम्यान सर्व वाहन चालक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या आयोजना बद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे,उपाध्यक्षा सुरेखा शेंडगे,सेक्रेटरी हेमलता दिक्षित,खजिनदार सौ.शुभांगी धसाडे मॅडम, मुख्याध्यापक दीप्ती मॅडम आदींनी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले.छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज होते म्हणून आपण आहोत. स्वराज्य म्हणजे काय असते? याचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांनी जगाला दाखवून दिलेला आहे.शिवाजी राजे एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते.त्यांचा जयंती उत्सव हा आपल्या महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व विचार लोकांपर्यंत पोहचले पाहिजे.म्हणून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शिवकार्याचा जागर करण्याचा हा प्रयत्न होता.असे शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे यांनी म्हटलेले आहे.



# शेवगाव शहरासह तालुक्यात शिवछत्रपती जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** (लक्ष्मण मडके) शहरात विविध ठिकाणी शेकडोंच्या संख्येने निघालेल्या टाळ मृदंग रॅली, ज्ञानोबा तुकाराम गजर करत पारंपारिक पोषाखात हाती शिवध्वज घेऊन लेझीम, पावल्या, फुगड्या खेळण्यात दंग झालेली तरुणाई... शिवराज्याभिषेक, मल्लखांब, रोपमल्यखांब अशा उत्साहपूर्ण वातावरणात सार्वजनिक शिवजयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी जय भवानी... जय शिवाजी... छत्रपती शिवाजी महाराज की जय...... जय जिजाऊ... जय शिवराय... आदी घोषणांनी संपूर्ण शहरच नव्हे तर आसमंतही दणाणून सोडला. तसेच आबासाहेब काकडे विद्यालय व काकडे समूह, ज्ञानदीप विद्या मंदिर, बाळासाहेब भारदे हायस्कूल, रेसिडेन्सीअल हायस्कूल, त्रिमूर्ती पब्लिक स्कूल या शाळांनी झांज पथक, ढोल पथक, दिंडी पथक, लेझीम पथक, मल्लखांब तसेच विविध वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे ऐतिहासिक पथक,मावळ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी असे मिरवणुकीत पथके सहभागी झाल्याचे दिसून येत होते. तसेच शेवगाव तालुका सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती चषक ( जंगी कुस्तीचा भव्य आखाडा ), छत्रपती शिवाजी महाराज पालखी मिरवणूक, भव्य रक्तदान शिबिर, छत्रपती चषक ( दि.20 व 21 रोजी भव्य कबड्डी



स्पर्धा ) तसेच गुरुवार दि 22 रोजी शिवव्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे सर यांचे शिव व्याख्यान आयोजित केले असून असे विविध कार्यक्रमाचे नियोजन केलेले आहे. यंदा शहरात शिवजयंती निमित्त अबाल वृद्धां मध्ये अपार उत्साह पाहायला मिळाला. विविध रंगांचे पारंपरिक वस्त्रे, भगवा फेटा अन् गमचा हाती शिव ध्वज घेतलेली तरुणाई सर्वांचे आकर्षणाचे केंद्र ठरत होते. शहरातील चौकाचौकामधून निघालेली मिरवणूक आंबेडकर चौक, क्रांती चौक, मेन पेठ व शिवाजी महाराज चौक येथे समाप्त झाली. या कार्यक्रमासाठी हायस्कूल मधील विद्यार्थी, ग्रामस्थ, शिक्षक, तरुण मित्र उपस्थित होते. तसेच शहरासह तालुक्यातील मौजे ठाकूर निमगाव येथे ही गेल्या तीन दिवसापासून रंगभरण स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांनी शिवछत्रपती महाराजांची जयंती साजरी करण्यात आली आहे. तसेच गदेवाडी, हातगाव, मुंगी, बोधेगाव, लाडजलगाव, बालमटाकळी, चापडगाव, ठाकूर निमगाव, वाघोली सह आदी गावामध्ये उत्स्फूर्तपणे शिवजयंती साजरी करण्यात आली. सकाळी सात वाजेपासूनच क्रांती चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमींची गर्दी पाहायला मिळाली. अनेकजण आपल्या कुटुंब व लहान मुलांसह महाराजांना अभिवादन करण्याकरीता दाखल होत असल्याचे पाहायला मिळाले. आबासाहेब काकडे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मल्लखांब व रोपमल्यखांबाची चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर केले व रेसिडेन्सीअल हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी मिरवणुकीमध्ये शिवअभिषेक व शिवराज्याभिषेक दिन असे विविध प्रात्यक्षिके सादर केली व यावेळेस दोन्ही शाळांनी सर्व शेवगावकरांचे लक्ष वेधून घेतले होते.

# चहाचे पैसे मागितल्याने एकाचा खुनाचा प्रयत्न

## शिर्डी येथील खळबळजनक घटना

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात शनिवारी पहाटेच्या काकड आरती पूर्वी पहाटे ४ वाजेच्या सुमारास चहाचे पैसे मागतो का म्हणून एका चहा विक्रेत्यावर धारदार शस्त्राने हल्ला साईबाबा मंदिराच्या समोरच गेट नंबर एक नगर मनमाड रोड लगत घडल्याने शिर्डीत खळबळ उडाली आहे होती तर काही वेळ साईभक्त देखील भयभीत झाले.

बाळासाहेब मोकाटे या जखमी तरुणास साईबाबा सुपर हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आलेमात्र प्रकृत्ती गंभीर असल्याने नगर येथे दाखल केले आहे. अन्नासाहैब मोकाटे यांनी दिलेल्या फिर्यादीत माझा भाऊ बाळासाहेब मोकाटे यास काही तरुणांनी चहा पिऊन सिगारेट मागितली व त्या चहा सिगारेटचे पैसे मागितल्याचा राग येऊन तरुणांनी थेट चाकू हल्ला करत कानावर,हातावर व इतर ठिकाणी वार करत गंभीर जखमी केले भाऊ रक्ताच्या थारोळ्यात पडला... हल्ला करणारे पसार झाले असून त्यातील एक हल्लेखोराला मार लागल्याने त्याला सुपर हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे सदर तरुण इर्टिगा वाहनातून आले होते व या वाहनात बियर व दारूच्या बाटल्या सुद्धा मिळून आल्या आहेत सदर वाहन शिर्डी पोलिस स्टेशनने जप्त केले आहे ज्ञ आरोपी लक्ष्मीकांत शेजवळ ह्याच्यावर गुन्हा रजिस्टर नंबर ८८/२०२४ भादवी ३०७ ५०४ ,५०६ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे या तरुणावर या अगोदर देखील गंभीर गुन्हे दाखल आहे मात्र ...शिर्डी शहरात दिवसेंदिवस वाढणारी गुन्हेगारी,छोट्या छोट्या कारणांवरून थेट होणारे चाकू हल्ले, तरुणांमध्ये वाढती गुन्हेगारी प्रवृत्ती पाहता पोलिस प्रशासनाने याकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देणे गरजेचे असून गुन्हेगारांना कठोर शासन करण्याची गरज आहे.

# महानगराच्या धर्तीवर साईबाबा संस्थानने गार्डन विकसित करावे

आधुनिक केसरी न्यूज

**नानासाहेब काटकर**

**शिर्डी :** साईबाबा संस्थान शिर्डी माध्यमातून द्वावारती जवळ असलेल्या गार्डन मध्ये लहान मुलाच्या मनोरंजनासाठी काही नव्याने आधुनिक साहित्य त्रिस्तरीय समितीच्या माध्यमातून नुकतीच काही दिवसांपूर्वी बसवण्यात आल्यामुळे साईभक्त भाविकासह स्थानिक ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असले तरी साईबाबा संस्थानने हे गार्डन शहर व महानगराच्या धर्तीवर विकसित केले तर साईभक्त भाविकासह स्थानिक ग्रामस्थ व लहान मुलांसाठी मनोरंजक म्हणून मोठा फायदा होईल असे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे नगर जिल्ह्याचे अध्यक्ष नानासाहेब काटकर यांनी मागणी केली आहे. आधिक माहिती अशी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी हे गार्डन असुन स्थानिक लोकसंख्या ३५ हजार असुन ६० हजार भाविक साई दर्शनासाठी येत असतात साई दर्शन झाले की श्रीमत लोक वॉटर पार्क थिम पार्क क्रुषी पर्यटन केंद्र या ठिकाणी भेट देत असतात मात्र सामन्य लोकांना हा खर्च परवडत



नाही स्थानिक गार्डन आहे मात्र ज्या प्रमाणात मुलासाठी मनोरजन साधनाचा नेहमीच अभाव होता त्यात आणखी साहित्य वाढवले असले तरी त्यात मोठ्या प्रमाणावर मनोरंजनाच्या दृष्टीने शहर महानगराच्या धर्तीवर वर जर हे गार्डन साईबाबा संस्थान ने विकसित करण्याची गरज असुन तीन ते चार एकर परिसरात हे गार्डन असले तरी आधुनिक पद्धतीने ते आणखी चांगले विकसित केले तर त्याचा लाभ स्थानिक ग्रामस्थ साईभक्त भाविकासह लहान मुलांना होईल व काही कुटबाना जर या ठिकाणी गर्दी वाढली तर व्यावसायिक रोजगार देखील वाढेल असे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे नगर जिल्ह्यातील अध्यक्ष नानासाहेब काटकर यांनी व्यक्त केली आहे.

# विनोद वाईन शॉप हटवल्याचा आनंदोत्सव साजरा

## डॉ. बाबासाहेबांचा पुतळा गुलाबजलाने धुऊन विद्यार्थ्यांना वह्या-पेन वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील जेल रोडवरील विनोद वाईन शॉप हटविण्याच्या आंदोलनाचा विजयोत्सव मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या मागीलबाजूस असलेले मद्यविक्रीचे विनोद वाईन शॉप स्थलांतरीत होत नाही तो पर्यंत बंदच ठेवण्यात यावे असे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. यासाठी आजपर्यंत अनेक वेळा आंबेडकरी विचारधारेच्या विविध पक्ष संघटनांनी अनेकदा आंदोलने केली होती. आझाद समाज पार्टीचे आनंद लोंढे यांनी गेल्या काही महिन्यापासून निवेदने, मोर्चे, चक्काजाम, तोडफोड, ठिय्या आंदोलन आणि शेवटी सात जनांसह ९ दिवस आमरण उपोषण केलं होतं. याच दरम्यान दलित समाजाने उत्स्फुर्तरित्या शहरातील विविध भागांमध्ये तसेच महामार्गांवर ५ फेब्रुवारी रोजी रास्ता रोको आंदोलन केलं होतं. यामुळे प्रशासनावर विनोद वाईन शॉप हटविण्याबाबत प्रचंड दबाव वाढला होता. परिस्थिती ओळखून शहराचे आमदार फारुख शाह यांनी मंत्रालयात राज्य उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री शंभूराजे देसाई यांच्याकडे बैठक घेऊन शासनास



निर्णय घेण्यास भाग पडले. त्यानंतर आमदारांच्या हस्ते उपोषण आंदोलन थांबविण्यात आले. यानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास गुलाबजलने स्वच्छ धुवून २०० गरजू विद्यार्थ्यांना वह्या-पेन इत्यादी शालेय साहित्य वाटप करून संवैधानिक मार्गाने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. महसूल, पोलीस प्रशासनासह राज्य उत्पादन शुल्क विभागाने आंदोलनांची दाखल घेऊन शासन निर्णय घेतल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानण्यात आले. हा विजय हा मोठ्या संघर्षाचा विजय आहे. हा विजय कोना एकाच नसून विनोद वाईन शॉपविरोधात लढणाऱ्या सर्वच आंदोलकांचा, आंबेडकरी जनतेचा विजय आहे. अशी भावना यावेळी आनंद लोंढे यांनी व्यक्त केली. याप्रसंगी जिल्हा पोलीस उपअधिक्षक मा. किशोर काळे धुळे जिल्ह्यातील आंबेडकरी समाजातील नेते तसेच सामाजिक कार्यकर्ते जितुभाऊ शिरसाठ, मा. आमदार फारुक शहा यांचे चिरंजीव शहबाज शाह, आनंदभाऊ सैंदाणे, मुकुंदराव शिरसाठ, मुकेश खरात, बांबी वाघ, संजय अहिरे, निशांत मोरे, देविदास जगताप, कल्याण गरुड (पहेलवान), महेंद्रदादा शिरसाठ, राज चव्हाण, दिलीप भामरे, पप्पूभाई सहानी, मनीबाबा खैरनार, ज्ञानेश्वर भामरे, चंद्रकांत सत्तेसा, रत्नशिल सोनवणे, लखनजी चांगरे,कैलास बाविस्कर, शशिकांत बाघ, विलास मोहिते, तात्या चव्हाण, मंगलदास बाघ, संजय सरदार, पुरुषोत्तम गरुड, नाना थोरात, विरे, दुर्योधन पाटील, चेतन गायकवाड, संजय दिवरे सर , सुरेश अहिरे, वाल्मिक जाधव, रंजना इंगळे, सिद्धार्थअण्णा जगदेव, नासिर पठाण, इकबाल शहा, आसिफ शहा, अफसर शहा, अँड, शितल जावरे, आकाश सोनवणे, सत्तेसा सर, विनोद केदार, संजय सरदार, झाल्टे सर, डॉ शरद भामरे, अनंत दामोदर, किरण मोरे, पवार योगेश जगताप, दिलीप मोहिते, ॲड. संतोष जाधव, भैय्या पारेराव, आबा अमृतसागर,भैय्या वाघ, सागर मोहिते, दावल वाघ, किरण भालेराव, मुकेश बाघ, बापू सोनवणे, दिनेश निकम, इश्वरवाद, सुभव जावर, रोहित सोनवणे, मलेश जिरे, भोला अहिरे, भूषण , आप्पाजी साळवे तसेच महिला भगिनी नयनाताई दामोदर, सरोजताई कदम, कल्पना सामुद्रे, मायाताई पानपाटील, अनिता सोनवणे, सोनुबाई सावकारे, निर्मलाबाई साळवे तसेच बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे पदाधिकारी, विविध विद्यालयांचे विद्यार्थी, शिक्षकवृंद, ज्येष्ठ नागरिक संघ पदाधिकारी उपस्थित होते.

# भूमिपुत्र संघटनेचे उपोषण सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण ठरणारी नदीजोड योजनेतून वाशिम जिल्हा वगळण्यात आला असून, सदर प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश करण्यात यावा. पीक विम्याची अग्रीम रक्कम वंचीत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी. नाफेड खरेदी सुरु करण्यात यावी तसेच शेतकऱ्यांना मोफत विज देण्यात येऊन, वन्य प्राण्यांच्या उपद्रवापासून सुटका करावी अशा विविध मागण्यांसाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संघटनेने आज पासुन उपोषण आंदोलन सुरू केले आहे. सदर आंदोलनाचा आज पहिला दिवस आहे.

भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून जिल्हाअधिकारी कार्यालयासमोर वाशिम येथे अमरण उपोषणस आज दि. 20 रोज मंगळवारला सुरुवात करण्यात आली. वाशिम जिल्ह्याला नदीजोड (वैनगंगा- नळगंगा ) प्रकल्पातून वगळण्यात आले आहे. या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचा समावेश करण्यात यावा, पीकविम्याची ॲग्रीम 25% व नियमित पीक वीमा शेतकऱ्यांना मिळवा. नाफेड व्दारा सोयाबीन खरेदी करावी. कृषीपंपाला मोफत व मुबलक वीज देण्यात यावी. रोही, रानडुक्कर, हरीण या जंगली जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा. ग्रामीण भागातील गोरगरीबांना मिळणाऱ्या घरकुल अनुदानात दुप्पट वाढ करून सरकारने जागा उपलब्ध करून द्यावी अथवा जागेसाठी वेगळा नीधीची तरतुद करावी. ह्या शेतकरी हीताच्या मागण्यांसाठी अमरण उपोषण सुरू झाले आहे. उपोषणसाठी भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर, जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, वाशिम तालुकाध्यक्ष संतोष सुर्वे, जिल्हाकार्यध्यक्ष बालाजी बोरकर हे बसले आसुन आज विविध संघटना व विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी भेटी दिल्या यामध्ये ॲड संतोष माणस, वसंतराव कुटे, गजानन सदार, केशव गरकळ, देव इंगोले, इरफान शेख, संजय सरकटे, विठ्ठल इढोळे, प्रकाश इंगोले, सुभाष काठोळे याच्यांसह अनेक शेतकरी व भूमिपुत्र च्या कार्यकर्त्यांनी अंदोलनास भेटी दिल्या.



# 'गर्जा महाराष्ट्र माझा' कलाविष्काराच्या माध्यमातून महाराष्ट्राची परंपरा व संस्कृतीचे घडले दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जात्यावरच्या ओव्या, भूपाळी, भारुड, गवळण, मंगळागौर यातून महाराष्ट्राची संस्कृती, मराठी माणसाची दिनचर्या तसेच महाराष्ट्रात साजरे केले जाणारे विविध सणसमारंभ व उत्सवाची झलक "गर्जा महाराष्ट्र माझा" या कलाविष्कारातून सादर करण्यात आली. या माध्यमातून महाराष्ट्राची परंपरा व संस्कृतीचे दर्शन घडले. औचित्य होते बल्लारपूर, महासंस्कृती महोत्सवाचे. स्थानिक कलाकारांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या "गर्जा महाराष्ट्र माझा" कलाविष्कार तसेच वाघनृत्य, शिवमहिमा, गीत, संगीत आणि नृत्याविष्कार सादर करुन बल्लारपूरकरांची मने जिंकली. बल्लारपूर महासंस्कृती महोत्सव कार्यक्रमात यामुळे उत्तरोत्तर रंगत येत गेली. यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगांवकर, बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार ओमकार ठाकरे, चंदनसिंह चंदेल आदी उपस्थित होते. बल्लारपूर शहराला 600 वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने सांस्कृतिक कार्य संचालनालय, जिल्हा प्रशासन आणि बल्लारपूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने, बल्लारपूर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वप्रथम सतीश कणकम यांनी साकारलेले जय शिवराय वाघनृत्य सादर करण्यात आले. त्यानंतर नवरंग डान्स अकॅडमी मार्फत गणेश जन्म, शिवतांडव, शिव अघोरी नृत्य आदीवर आधारित शिवमहिमा सादर करण्यात आले. तसेच स्पार्क जनविकास फाउंडेशन, चंद्रपूर निर्मित "गर्जा महाराष्ट्र माझा" या कलाविष्कारातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. नवोदित कलावंताना व्यासपीठ मिळावे या उद्देशातून गर्जा महाराष्ट्र माझा कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नूतन पदाधिकारी निवडी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने खंडाळा तालुक्यात पक्षीय संघटन बांधणीसाठी वेग आलेला असून नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर केल्या जात आहेत. शिरवळच्या गेस्ट हाऊस येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत अनेक निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत. जिल्हाप्रमुख सचिन मोहिते ह्यांच्या उपस्थिती मध्ये निवडी कार्यक्रम संपन्न होत असताना जिल्हा समन्वयक रामदास कांबळे,जिल्हा संघटक सुधीर राऊत, उपजिल्हाप्रमुख अजित यादव,तालूका प्रमुख सागर कदम तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खंडाळा तालुका पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी नूतन पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र जिल्हाप्रमुख यांच्या हस्ते देण्यात आले.जिल्हा परिषद गट,गण तसेच शहर उपशहर आदी पदावर अनेकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. यंदाची लोकसभा,विधानसभा आणि जिल्हापरिषद पंचायती समितीच्या निवडणूका मोठ्या ताकतीने लढायच्या आहेत.यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा पातळीवरील नेते मंडळी कामाला लागलेले आहेत. येणाऱ्या काळात आपल्या विरोधकांचा दारुण पराभव करायचा आहे.हा दृढनिश्चय आम्ही बांधला आहे, असे पदाधिकारी म्हणत आहेत. नूतन पदाधिकाऱ्यांमध्ये गजानन भरगुडे-उपतालुका प्रमुख (शिरवळ गट),अमोल गाढवे-उपतालुका प्रमुख (खेड गट),गणेश मांढरे-विभाग प्रमुख (पळशी गण),विठ्ठल महाले-विभाग प्रमुख (शिरवळ गण),यशवंत



सोनवणे-विभाग प्रमुख (खेड गण),संतोष शिर्के-विभाग प्रमुख (भादे गण),निलेश वीर-विभाग प्रमुख (नायगाव गण),तुषार जाधव-उपविभाग प्रमुख (पळशी गण), अनिल वीर-उपविभाग प्रमुख (पळशी गण),अमित पवार-उपविभाग प्रमुख (बावडा गण),विक्रांत भोसले-उपविभाग प्रमुख (बावडा गण),महेश चव्हाण-उपविभाग प्रमुख (भादे गण),भानुदास ठोंबरे-उपविभाग प्रमुख (भादे गण),बाळासाहेब जाधव-उपविभाग प्रमुख (नायगाव गण),विजय मगर-उपशहर प्रमुख शिरवळ,महेश रवळेकर-उपशहर प्रमुख शिरवळ,शेखर खंडांगळे- उप शहर प्रमुख खंडाळा,प्रमोद शिंदे-उप शहर प्रमुख खंडाळा,हेमंत पवार-उप शहर प्रमुख लोणंद,अविनाश नलवडे-उप शहर प्रमुख लोणंद आदींच्या निवडी करण्यात आलेल्या आहेत.
या निवडी बद्दल नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.नूतन पदाधिकाऱ्यांनी पक्ष वाढीसाठी विशेष प्रयत्न केले पाहिजे.अशी अपेक्षा पदाधिकारी व्यक्त करत आहेत.खंडाळा तालुक्यात गाव तिथे शाखा ही मोहीम राबविली जाणार आहे. येणाऱ्या निवडणुकीतून मिंदे गटाचे पानीपत केल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही. खंडाळा तालुक्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे निष्ठावान सैनिक हे कार्यरत आहेत.ह्या निष्ठावान सैनिकांच्या विश्वासावर हा तालुका भगवामय करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे यांनी म्हटले आहे.निष्ठावान सैनिक आजही आमच्या पक्षासोबत आहेत.त्यामुळे हे निष्ठावान सैनिक हेच आमची ऊर्जा आहे.त्यांच्या मुळेच पक्षाची बळकटी मजबुतच आहे.निष्ठावान सैनिक हीच खरी आमची खरी संपत्ती असल्याने येणाऱ्या काळात हेच निष्ठावान सैनिक विरोधकांचा पराभव करतील.असा विश्वास रामदास कांबळे यांनी व्यक्त केला.

# नगर रस्त्यावर गर्दीच्या वेळेत जड वाहनांना बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नगर रस्त्यावर सुरू असलेले मेट्रोचे काम, उड्डाणपुलाच्या कामामुळे कोंडी होत आहे. जड वाहनांमुळे वाहतूक विस्कळीत होत असल्याने नगर रस्त्यावर गर्दीच्या वेळेत अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता जड वाहनांना प्रायोगिक तत्त्वावर बंदी घालण्यात आली आहे.
अग्निशमन दलाची वाहने, रुग्णवाहिका, पीएमपी बस, खासगी बस, तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून जड वाहनांना नगर रस्त्याचा वापर करण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे. नगर रस्त्यावर दुतर्फा डंपर, सिमेंट मिक्सर, जेसीबी, रोड रोलर अशी अवजड वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. पुणे-नगर रस्त्यावरील वाघोली परिसरातील वाघेश्वर चौक, वाघोली ते खराडी बाह्यवळण मार्गावर सकाळी सात ते दहा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत अवजड वाहनांना बंदी राहणार आहे. केसनंद रस्त्यावरील वाघोली ते शिवाजी चौक ते केसनंद गाव रस्त्यावर जड वाहनांना सकाळी सात ते दहा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत बंदी राहणार आहे.
लोहगाव ते वाघोली ते धानोरी या मार्गावर जड वाहनांना सकाळी सात ते दहा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत जड वाहनांना बंदी घालण्यात येणार आहे. पुणे-नगर रस्त्यावरील वाघेश्वर चौक, वाघोली ते लोणीकंद रस्त्यावर सकाळी सात ते दहा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे.



# छत्रपती शिवाजी विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित कै. लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय व छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथे रयतेचे राजे स्वराज्य संस्थापक शिवछत्रपती शिवाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त विद्यालयात प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील व सचिव रत्नाताई कोलते पाटील उपस्थित होते सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रयतेचे राजे यांच्या प्रतिमेला प्राचार्य नारायण कोलते पाटील व शिक्षकवृंद यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी प्रा जीवन कोलते पाटील यांनी शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवनावर प्रकाश टाकला विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी प्राचार्य नारायण कोलते पाटील, सचिव सौ.रत्नाताई कोलते पाटील, संस्थाचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील, डॉ.प्रा.प्रवीण सरकटे,प्रा.शिवाजी सत्रे यांची उपस्थिती होती.
कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. पंजाबराव शेळके यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भास्कर खमांट यांनी परिश्रम घेतले आहेत.सर्व विद्यार्थी व गावातील पालक मान्यवर उपस्थित होते शाळेतील शिक्षकसर्व शिक्षक सर्व विद्यार्थी व शिक्षक विकास पाटील, विजय सिंग राजपूत, भास्कर ससाणे, संजय जोशी, भास्कर खमाट, मुकुंद व्यवहारे, सुदाम राठोड, ज्ञानेश्वर राठोड, पोपटराव सोनवणे, भूषण देसले, प्रा. जीवन कोलते पाटील, शाम जाधव, अजबराव चव्हाण, बाबासाहेब कोलते, राहुल बडक, गणेश मोहने, गणेश सत्रे, जयराम घोती, सतीश खवले, पंजाबराव शेळके, योगेश थोटे, सतीश गावंडे, जयराम घोती मनोहर पडोळ, संजय अमृतकर, शिवाजी सत्रे इत्यादी प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते तर सर्व विद्यार्थी व पालक उपसंपादक तथा जेष्ठ पत्रकार बंधू गोकुळसिंग राजपूत, रहीम पठाण, सुनील चोरमले, जब्बार एस तडवी सर्व पालकांचे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार शिवाजी सत्रे यांनी मानले.

# लॉयन किड्स स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ०७ फेब्रुवारी रोजी सुशीला देवी बहुदेशीय सेवाभावी शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित, लॉयन किड्स स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन राजनगर, मुकुंदनगर छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सुशीला देवी बहुदेशीय सेवाभावी शिक्षण संस्थाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.संदीप आघाव हे उपस्थित होते. तर उद्घाटक म्हणून अनिल पवार सामाजिक कार्यकर्ते छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. तसेच प्रमुखअतिथी म्हणून ॲड. आकाश बागल ( जिल्हा सत्र व उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर), मोहन नाना साळवे (मा.नगरसेवक ) प्रमुख उपस्थिती म्हणून अक्षय मुळे, सौ.पद्मा तुपे, परमेश्वर पलाय, स्वप्नील राठोड दत्ता गुरव, उद्धव वाघ तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.
या प्रसंगी सुशीला देवी बहुदेशीय सेवाभावी शिक्षण संस्थाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. संदीप आघाव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. तसेच कार्यक्रमास उपस्थित उद्घाटक अनिल पवार साहेब व प्रमुख पाहुणे ॲड. आकाश बागल यांनीही विद्यार्थ्यांच्या पुढील कार्यक्रमास व वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शेवटी सौ.जाधव मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. त्यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी सर्व विद्यार्थी विद्यार्थ्यीनींनी एकापेक्षा एक सरस व बहारदार न्रुत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.




# कन्नड येथे विविध ठिकाणी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात विविध ठिकानी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी शिवाजी महाराज पुतळ्यास दुग्ध अभिषेक करून विविध कार्यक्रमास सुरवात करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक, वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धेसह विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात शिवजयंती शिवजयंती साजरी करण्यात आली. शिवाजी महाराज यांना सर्वांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक सुनील पवार, अध्यक्ष मनोज पवार,विजय भोसले, दिपक दाभाडे, डॉ .सदाशिव पाटील, राम पवार सिद्धार्थ निकाळजे, अभिषेक देशमुख, सचिन काळे, रोहिदास पाटील, अमोल मैराळ, उद्धव पवार, उपाध्यक्ष गोरख पाटील, प्रकाश जिरेमाळी, अनिल शिरसाट, सहसचिव आकाश सुरे, दीपक घाडगे, कोषाध्यक्ष राजधर सोनवणे, सहकोषाध्यक्ष आकाश काळे, प्रशांत बारगळ, रेणुकादास कुलकर्णी, यांची प्रमुख उपस्थीती होती.
शिवजन्मोत्सव निमित्त स्मारकाजवळ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्यानिमित्त आमदार उदयसिंग राजपुत उद्योजक मनोज पवार, संघर्ष कन्या संजनाताई जाधव, माजी नगर अध्यक्ष संतोष कोल्हे, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, तहसीलदार विद्याचरण कवडकर,पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या हस्ते विद्यार्थांना पारितोषिक वितरण करण्यात आले या नंतर सायंकाळी हिवरखेडा रोड येथुन शोभा यात्रेची सुरुवात करण्यात आली. या वेळी राम पवार, अशोक पवार, सुरेश चव्हाण, अशोक वाहुळ, सचिन पवार, राजधर सोनवणे, संतोष पवार, सचिन काळे, संतोष निळ तसेच या शिवजयंतीमध्ये महीला शिव भक्तांचा सहभाग होता.



# झाडीपट्टी सांस्कृतिक महोत्सव देशात साजरा होणार

## अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी व्यक्त केला विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**मूल :** सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असलेल्या महाराष्ट्रात लोककला ग्रामीण भागातील कलावंत जोपासत असल्याने त्यांच्या कलेला वाव देणे गरजेचे आहे. कलाकार कितीही मोठा झाला तरी राजाश्रया शिवाय वास्तविक मोठा होऊ शकत नाही हे लक्षात घेऊन सुधीर मुनगंटीवार यांनी ग्रामीण भागात झाडीपट्टी सांस्कृतिक कला महोत्सव आयोजित केले, त्यामुळे येत्या काळात झाडीपट्टी कला महोत्सव राज्यातच नव्हे तर देशात साजरा झाल्याशिवाय राहणार नाही. असा विश्वास अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी व्यक्त केला. सांस्कृतिक मंत्रालय व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक क्रीडा संकुल येथे आयोजित तीन दिवसीय झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सवाचे उद्घाटन आज सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संमेलनाध्यक्ष पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांचे शिवाय जेष्ठ कवियत्री अंजना खुणे, अभिनेता अक्षय कुलकर्णी, नाट्य निर्माते सदानंद बोरकर, माजी नगराध्यक्ष रत्नमाला भोयर, उपाध्यक्ष नंदकिशोर रणदिवे, तालुका समन्वय समिती अध्यक्ष प्रभाकर भोयर, धनश्री नागरी सहकारी पत संस्थेचे अध्यक्ष अजय गोगुलवार, माजी नगरसेवक प्रशांत समर्थ, महेंद्र करकाडे, वंदना वाकडे, प्रवीण मोहुर्ले, डॉ. किरण किशोर कापगते आदी उपस्थित होते.

कलेची देवता नटराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेलाषअभिवादन व दीप प्रज्वलनाने महत्त्वाचे उद्घाटन झाले. गायक संतोष कुकुडकर आणि संचाने सादर केलेले झाडीपट्टी गीत व महाराष्ट्र गीत आणि युवराज गोंगले व ममता गोंगले संचाने सादर केलेल्या स्वागत गीतामुळे महोत्सवात रंगत आली. प्राचार्य सदानंद बोरकर यांनी प्रास्ताविक केले. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या झाडीपट्टीतील जिल्ह्यात दीडशे वर्षाची परंपरा असलेली लोककला जोपासण्यासाठी विद्यापीठाने सांस्कृतिक केंद्राची स्थापना करावी,



अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. परशुराम खुणे यांनी कला महोत्सवाचे आयोजन करून शासनाने झाडीपट्टीतील लोककलाकारांच्या सन्मान केला, याविषयी समाधान व्यक्त करत सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रति आभार व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान झाडीपट्टीतील बहिणाबाई म्हणून परिचित असलेल्या कवयित्री अंजना खुणे, नाट्य निर्माते प्राचार्य सदानंद बोरकर, नाट्य कलावंत हिरालाल पेंटर आणि पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या शासनाचे वतीने जीवन गौरव पुरस्कार तर विविध नाट्य मंडळाचे माध्यमातून परीसरात लोककला जोपासत असल्याबद्दल नाट्य कलावंत अरविंद झाडे, विजय मुळे, शेखर पटले, शबाना खान, मंजुषा जोशी, मुकेश गेडाम, भूमाला कुमरे, देवेंद्र दोडके, नारायण चुदरी, अब्दुलगनी शेख, शेखर डोंगरे आदी कलावंतांच्या शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व अक्षय कुलकर्णी यांचे हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी झाडीपर्व या विशेषांकाच्या मुखपृष्ठाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन गजानन कोर्टलवार यांनी तर अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व संमेलनाध्यक्ष डॉ. परशुराम खुणे यांच्या परिचय मंजुषा जोशी यांनी करून दिला. सुखदेव चौथाले यांनी आभार मानले. कार्यक्रमाला चंद्रपूर गडचिरोली भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील लोक कलाकार आणि निमंत्रित मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दहशत माजवणाऱ्या तरुणांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात सोमवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शिवजयंती बघण्यासाठी आलेल्या शिर्डी साकुरी येथील सुदर्शन शशिकांत वाणी वय २४ हा तरुण हॉटेल सावता लॉज जवळून जात असताना त्याच्या ओळखीचे निखिल महादेव सोनवणे आर्यन राजकुमार पाटील राहणार शिर्डी प्रदीप सुनील सोनवणे राहणार काकडी ता राहता या तिघांनी वाणी यास पकडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करत फिरायला का आला असे म्हणत पैसे व मोबाईल काढून दे अशी मागणी केली विरोध केला तर तलवारीने मारून टाकू अशी धमकी देत तलवार व चोपर काढत डोक्यावर हातावर पार्श्वभाग भागावर कमरेवर वार करून जखमी केली जीव वाचवण्यासाठी पळत असताना त्यांनी माझा पाठलाग देखील केला मात्र गर्दी झाल्याने ते पसार झाले या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली होती वाणी यांनी या तीन तरुणांच्या विरोधात कायदेशीर तक्रार शिर्डी पोलीसात दिल्यामुळे शिर्डी पोलिसांनी पादवी ३२७,३२० , ५४,३४, व आर्म अक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे अधिक तपास पोलीस निरीक्षक रामचंद्र कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संभाजी पाटील सतिश पगारे पोलीस कर्मचारी पी सी पवार बाबासाहेब खेडकर राजेंद्र बिरदवडेयांनी या तीन तरुणांना शिताफीने पाठलाग करुन अटक केली असून लवकरच शस्त्र देखील हस्तगत करण्यात यश मिळेल असे पोलीसांनी सागितले.

# कोटगुलजवळ उधळला घातपाताचा डाव; पोलिसांच्या पायवाटेवर होता बॉम्ब

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** नक्षलविरोधी अभियान राबविणाऱ्या पोलिस दलासोबत घातपात घडविण्याचा नक्षलवाद्यांचा डाव पोलिसांच्या सतर्कतेमुळे सोमवारी उधळल्या गेला. कुरखेडा उपविभागाअंतर्गत कोटगुलजवळील पहाडाच्या पायथ्याजवळच्या पायवाटेवर नक्षलवाद्यांनी कुकर बॉम्ब पेरून ठेवला होता. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाकडून अत्याधुनिक उपकरणाद्वारे जंगल परिसरात शोधमोहीम सुरू असताना हा बॉम्ब आढळला. त्या बॉम्बमध्ये जवळपास दोन किलो स्फोटकं होती. तो बॉम्ब त्याच ठिकाणी नष्ट करण्यात आला.

कोटगुल पोलिस स्टेशनपासून 500 मीटर अंतरावर असलेल्या पहाडीच्या पायथ्याजवळ गोंडरी जंगल परिसराकडे जाणाऱ्या पायवाटेवर नक्षलवाद्यांनी पोलिस पथकाला लक्ष्य करत घातपात घडवण्याच्या उद्देशाने जमिनीत स्फोटके पुरुन ठेवली होती. यासंदर्भातील गोपनिय माहिती कोटगुलचे प्रभारी अधिकारी धनंजय कुलकर्णी यांना मिळाली. त्यांनी वरिष्ठांना कळविताच त्या ठिकाणी बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाला (बीडीडीएस) पाठवण्यात आले.

बीडीडीएस पथकातील विविध अत्याधुनिक उपकरणांद्वारे जंगल परिसरात सर्चिंग करत असताना, एक संशयित जागा मिळून आल्याने तिथे पाहणी केली असता, अंदाजे दिढ ते दोन फुट खोल जमिनीमध्ये स्फोटक पदार्थ भरुन असलेला प्रेशर कुकर मिळून आला. त्याची बिडीडीएस पथकाने एक्सप्लोझिव्ह



किटने तपासणी केली असता, त्यामध्ये अंदाजे 2 किलो स्फोटके असल्याची खात्री झाली. त्यामुळे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्फोटक पदार्थ घटनास्थळावरच नष्ट करण्यात आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलिस अधीक्षक (अहेरी) एम.रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी कुरखेडा रविंद्र भोसले यांच्या नेतृत्वात कोटगुल पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, बीडीडीएस पथकाचे प्रभारी मयुर पवार, पोहवा पंकज हुलके, पोहवा अनंतराव सोयाम, अंमलदार संचिन लांजेवार व चालक तिम्मा गुरनुले यांनी यशस्वीरित्या पार पाडली. माओवाद्यांनी हिंसक वाट सोडून आत्मसमर्पण करुन सन्मानाने जीवन जगण्याचे आवाहन पोलिस अधीक्षकांनी केले.

# तरुण पिढीने शिवछत्रपती महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवावा : रामभाऊ वारंगणे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** मोलखेडा व हिवरी या ग्रामपंचायत कार्यालयात शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल प्रशासक, युद्धनीती, राजनीती निपुण असे आदर्श लोककल्याणकारी राजे होते. आजच्या तरुणांनी छत्रपती शिवाजी महारज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन समाजसेवक रामभाऊ रामचंद्र वारंगणे यांनी केले. ग्रामपंचायत कार्यालयात शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्त प्रारंभी सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. कार्यक्राची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे यांनी



केले. यावेळी सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, ग्रामपंचायत सदस्य स्वातीताई इंगळे, सरपंच ज्ञानेश्वर वारंगणे, वैभव गायकवाड, समाजसेवक रामभाऊ रामचंद्र वारंगणे, ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम व ग्रामपंचायत सर्व सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी यांची व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# छत्रपतींच्या जयघोषाने गाव दुमदुमले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात ढोल ताशांच्या गजरात हाजारो शिवभक्तांनी भक्तीमय वातावरणात साजरा केला, शिवजन्म पूर्वसंध्येला सावळदबारा येथील पुरूष व महिला मंडळांनी शिवज्योत रॅली काढून छत्रपती शिवाजी महामाज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात अतिषबाजी केली.
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त सावळदबारा गावात सकाळपासूनच विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आले. सकाळी ९.३० वाजेच्या सुमारामास छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास सरपंचपती शिवाआप्पा चोपडे व शिवप्रेमींनी पुष्पाहार अर्पण करून अभिवादन केले, विविध सामाजिक, गावात व परिसरात जागोजागी अन्नदान आयोजित केले होते. जय भवानी मित्र मंडळाच्या येथे सार्वजनिक ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता, या सोहळ्यात प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी शिवचारित्र्यावर व्याख्यान दिले. या ठिकाणी पुरुष व असंख्य महिला कार्यकर्ता यावेळी उपस्थित होत्या. दुपारी ३ वाजेच्यानंतर गावातील विविध भागातून मोठ्या प्रमाणात ढोल-ताशे व डि.जे.च्या गजरात मिरवणूक निघाली होती. गावात प्रत्येक चौक सजविण्यात आले होते.महिलांनी आपल्या घरासमोर सडासारवान करून रांगोळ्या काढल्या होत्या. या मिरवणूक रात्री उशीरापर्यंत शांतते सुरू होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जय घोषाने सावळदबारा नगरी दुमदुमली होती. मिरवणूकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी फर्दापूर येथील पोलिस स्टेशनचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे, उपनिरीक्षक सुग्रीव चाटे, उपनिरीक्षक सुरेश माळी व बिट जमादार मिरखॉ तडवी यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# 'सिझर न झालेल्या कविता' संग्रहाला साहित्यभूषण व साहित्यरत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज





**बुलढाणा :** मेहकर येथील सुप्रसिद्ध कवी डॉ.सुनील श्रीराम पवार यांच्या 'सिझर न झालेल्या कविता' या बहुचर्चित कविता संग्रहाला माय बाप प्रतिष्ठानचा साहित्यभूषण आणि उज्ज्वल प्रतिष्ठानचा साहित्यरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. एकाच महिन्यात डॉ. पवार यांच्या कविता संग्रहास दोन पुरस्कार मिळाले. त्यामधील पहिला पुरस्कार वितरण सोहळा १७ फेब्रुवारीला सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी येथील रोटरी हॉलमध्ये पार पडला. सैराट फेम अभिनेते प्रा. संजय साठे यांचे हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे विनोद तांबे, शंतनू उंट, साहित्यिक नागू विरकर, इंद्रजित पाटील यांची उपस्थिती होती.

तसेच दुसरा पुरस्कार १९ फेब्रुवारीला शिवजयंती निमित्त नांदेड जिल्ह्यातील खुरगाव येथे शिवानंद निमगिरे सहायक आयुक्त सामाजिक न्याय विभाग नांदेड , याचे हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक भदंत पंय्योबोधी, उज्ज्वल प्रतिष्ठानचे प्रकाश ढवळे उपस्थित होते.रोख रक्कम,स्मृतीचिन्ह,मानपत्र,पदक असे पुरस्काराचे स्वरूप होते. सुनील पवार यांच्या 'सिझर न झालेल्या कविता' संग्रहास फेब्रुवारी महिन्यात हे दोन पुरस्कार मिळाले, ही बुलढाणा जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

माझ्या कविता संग्रहाला साहित्यभूषण आणि साहित्यरत्न पुरस्कार मिळाल्याचा आनंद होतोय. मात्र पुरस्कारही तिरस्कार वाटावेत असा हा काळ आहे. परंतु निखळ गुणवत्तेच्या बळावर साहित्यकृतीला पुरस्कृत करणाऱ्या महाराष्ट्रात अनेक संस्था आहेत. त्या साहित्यिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असतात. त्यापैकीच मायबाप प्रतिष्ठान व उज्ज्वल प्रतिष्ठान असल्याचा अभिमान आहे.

ॲड. उज्ज्वल निकम साहेब आणि गीतकार प्रवीण दवणे यांचे हस्ते नाशकात या संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यानंतर महाराष्ट्रतील अनेक साहित्यकांनी भरभरून लिहले. कारण माझ्या कवितेत पानं , फुलं निसर्ग कधी आलाच नाही. वेदनेशी माझं नातं अतूट आहे. मला वेद कळत नाही तर वेदना कळतात. म्हणून गरिबीच्या धगीतूनच माझ्या कविता जन्माला आल्या आहेत. त्यासाठी मला प्रतिभेच्या उसन्या कळा आणाव्या लागल्या नाही. जे भोगलं , जे बोचलं तेच कवितेत माडलं अगदी सिझर न करता.



# वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रगतीचा प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे येसगाव नं दोन येथे आयोजित वक्तृत्व स्पर्धामधे कु प्रगती विठ्ठल काळे हिने प्रथम क्रमांक पटकावला व बक्षिसपात्र ठरली.शिवविचार मनामनात शिवजयंती घराघरात शिवजयंती नाचून नाही तर वाचून साजरी करावी या संकल्पनेतून जगदंब प्रतिष्ठान येसगाव नंबर 3 (माणिकनगर) येथे भव्य वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उपस्थित येसगावच्या सरपंच श्रीमती रेणुका ताई अरुण खंडागळे सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच परीक्षक प्राध्यापक विश्वंभर नलावडे प्राध्यापक योगेश इंगळे प्राध्यापक मनोज इंगळे प्राध्यापक राहुल राजपूत ह.भ.प. प्रद्युम्न महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. वकृत्व स्पर्धेचा प्रथम पारितोषकाची मानकरी रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कु प्रगती विठ्ठल काळे हिने प्रथम क्रमांक पटकवत 3100 रुपये रोख रक्कम व सन्मानचिन्ह मिळवले त्यामुळे तिचे परिसरातून कौतुक होत आहे. सूत्रसंचालन प्राध्यापक योगेश इंगळे यांनी केली.



# छत्रपती शिवराय हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**उमरी :** स्वराज्य संस्थापक कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उमरी शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी उमरी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने यांच्या हस्ते भगव्या ध्वजस्तंभावर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात जयंती समितीचे संयोजक पत्रकार बी.व्ही. चव्हाण यांनी शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने प्रास्ताविकातून थोर महापुरुषांची जयंती त्यातून होणारे समाज प्रबोधन व प्रेरणा याबाबत सविस्तर माहिती विषद केली. यानंतर आपल्या व्याख्यानातून संतोष देवराये यांनी आपले विचार मांडले. छत्रपती शिवाजी महाराजांनी शून्यातून स्वराज्य निर्मिती केली. मुठभर मावळ्यांना घेऊन जुलमी सत्तेला हादरा दिला व यत्तदेशीयांचे राज्य निर्माण केले.हे स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा होती. असे सांगून आपल्या रयतेला काडीचाही त्रास होणार नाही. याची त्यांनी दक्षता घेतली. सर्व विद्या पारंगत नीतिमान ,धुरंदर असा महापराक्रमी राजा म्हणून सबंध विश्वामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडे पाहिले जाते. सबंध विश्वामधील अनेक देशामध्ये शिवरायांच्या महापराक्रमी इतिहासावरून प्रेरणा घेतली जाते.

त्यांचे चरित्र वाचून व ऐकून आपल्या अंगी देश प्रेम समाज प्रेम निर्माण करणे व त्याचा अंमल करणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन संतोष देवराये यांनी केले. मोंढा मैदानात झालेल्या शिवजयंती उत्सव कार्यक्रमास उद्योजक मारोतराव कवळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीषराव देशमुख गोरठेकर , सुभाषराव देशमुख गोरठेकर , जिल्हा बँकेचे संचालक कैलासराव देशमुख गोरठेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने , उपनिरीक्षक एम. एन. चेवले, व्हीपीके उद्योग समूहाचे सीईओ संदीप पाटील कवळे, साहित्यिक दिगंबर कदम, माजी नगराध्यक्ष प्रवीण सारडा, संजय कुलकर्णी, सुभाष पेरेवार, डॉ. माधव विभुते, डॉ .अर्जुन शिंदे, पांडुरंग देशमुख गोरठेकर , डॉ. अमोल ढगे ,निवृत्त प्राचार्य ए .एस. जाधव, माजी उपप्राचार्य एम.एस. कदम , के. एस. शिंदे , अशोक मामीडवार, श्रीनिवास अनंतवार, अनिल दर्डा , साहेबराव शिंदे गणीपुरकर, अनिल सोनकांबळे , बालाजीराव पतंगे , राजू पाटील ढगे, बापूराव रिठेकर,पांडुरंग सोनकांबळे ,सोनू वाघमारे , अनिल नगनूरवार, परमेश्वर मुदीराज, किशनराव गायकवाड, प्रा.नागोराव मोरे, गुलाबराव जाधव , गोपीराज बेलकर, आदींसह शहरातील अनेक राजकीय पक्ष संघटनांचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते अधिकारी , कर्मचारी, नागरिकांची बहूसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन अखिल भारतीय मराठा युवा छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष राजेश जाधव यांनी केले.



# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल येथे शिवजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दरेगाव येथे महाराष्ट्राचे आद्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनियर कॉलेज दरेगाव तालुका खुलताबाद साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश वेताळ मुख्याध्यापक, या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते किरण ताकटे हे होते. सुरुवातीला शिवानी गायकवाड व प्रांजल गायकवाड यांनी शिवाजी महाराजांवर एक गीत सादर केला नंतर वकृत्व स्पर्धेला सुरुवात झाली. शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी स्पर्धा गाजवली. कार्यक्रमा च्यामध्ये बरोबर 10 .00 वाजता राज्य गीत सामुहिक गायण करण्यात आले. या नंतर अमृत राऊत, ऋतुजा गायकवाड, शिवानी गायकवाड आकाश काळे, अंजली सुरासे ,जय गायकवाड हर्षल गायकवाड, सुवर्ण गायकवाड, शिवराज ठोकळ ,ऋषिकेश गायकवाड वैष्णवी गायकवाड, कार्तिक गायकवाड, अतुल गायकवाड ,श्रद्धा गायकवाड, पुनम गायकवाड या विद्यार्थ्यांनी आपले भाषणातून शिवाजी महाराजांचे विचार मांडले व कर्तुत्वाचा इतिहास आपल्या भाषणातून व्यक्त केला यानंतर किरण ताकटे यांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेची वयाच्या सोळाव्या वर्षी आपला पराक्रम कसा दाखवला. शिवाजी महाराजांच्या संघर्ष शिवाजी महाराजांचे संस्कार याविषयी सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली. शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वेताळ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर झालेले संस्कार आणि आलेल्या संकटांना कसा सामना केला याबद्दल आपले विचार व्यक्त केल.

या कार्यक्रमासाठी भवर, पवार, शिंदे श्री बनसोडे, गायकवाड शिक्षकेतर कर्मचारी देवकर, दत्तू काका भरत काळे, श्रीमती रंजनाताई सर्व उपस्थित होत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी पडूळे व आभार प्रदर्शन शांताराम कापडणे यांनी केले.

# नूतन विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**मिरजगाव :** नूतन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानांतर्गत तालुकास्तरीय समिती मार्फत विद्यालयाची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुरल एज्युकेशन सोसायटी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. आदिनाथ चेडे होते. या कार्यक्रमासाठी रुरल एज्युकेशन सोसयटीच्या विश्वता व सहसचिव सौ.अंजली चेडे उपस्थित होत्या. तपासणी पथकामध्ये विस्तार अधिकारी लगड साहेब केंद्रप्रमुख विष्णू गायकवाड साहेब केंद्रप्रमुख लबडे साहेब मुख्याध्यापक शेळवन व परदेशी सर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी विचार आपल्या भाषणातून व्यक्त केले.

क्रीडा आदर्श शिक्षक श्री. शांताराम बावडकर सर यांनी विद्यार्थ्यांचे सुंदर लेझीम पथक प्रात्यक्षिक कार्यक्रम स्थळी घेतले. इयत्ता पाचवी व सातवीच्या विद्यार्थिनींनी राजांच्या गीतांवर नृत्य सादर केले. विद्यालयातील संगीत अलंकार संजय तुपे व विद्यार्थी तनिष्क चुंबळकर यांनी शिवाजी महाराजांविषयीचे स्फूर्ती गीत सादर केले. तपासणी पथकातील सर्व सदस्यांनी शालेय कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले. विद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय श्रीमंदीलकर यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित सर्वांचे

आभार प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक सुर्यवंशी यांनी मानले. सूत्रसंचालन संतोष बोराटे यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी श्रीम. देवयानी कुलांगे व दत्तात्रय रायकर, परसराम दळवी यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमास तसेच विद्यालयाचे उपमुख्याध्यापक जयंतराव चेडे, पर्यवेक्षक छगन हिंगणे, विद्यालयातील सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी ,विद्यार्थी उपस्थित होते.



# छत्रपतींचे नाव घेऊन सत्ता मिळवू पाहणाऱ्यांपासून सावध राहा

## शेकाप नेते भाई रामदास जराते यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**गडचिरोली :** छत्रपती शिवाजी महाराजांनी बारा बलुतेदार आणि अठरापगड जातींच्या लोकांना घेऊन स्वराज्य स्थापन केले होते. मात्र आज जाती धर्माच्या नावाने समाजात तेढ निर्माण करणारे छत्रपतींचे नाव घेवून पुन्हा सत्ता मिळवू पाहत असून शिवप्रेमी जनतेने येणाऱ्या काळात सावध राहावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई रामदास जराते यांनी केले.

तालुक्यातील राजोली येथील स्वराज्य युवा मंडळाने आयोजित केलेल्या शिवजयंती सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. भाई रामदास जराते पुढे म्हणाले की, रामराज्यांचे स्वप्न दाखवणाऱ्यांनी देशातील कष्टकरी, कामगार, शेतकरी, शेतमजूर, नोकरदार आणि युवक बेरोजगारांना उध्वस्त करणारे धोरणं लादण्याचे काम केले आहे. एवढेच नाही तर देशात धार्मिक उन्माद पसरविण्याचे काम भारतीय जनता पक्षाने चालविले असल्याची टीकाही त्यांनी केली.




कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रणय खुणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे जिल्हा प्रभारी राज बन्सोड, सामाजिक कार्यकर्ते विनोद मडावी, प्रतिक डांगे, सतिश दुर्गमवार, राजोली च्या सरपंच कांता हलामी, उपसरपंच पंकज कन्नाके, जमगावचे सरपंच देवीदास मडावी, तंटामुक्त समितीचे संजय तुंकलवार, तलाठी वासनिक, ऊसेंडी, नागवेलीचे शिक्षक दुर्गे, वनरक्षक गोडवे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान पोटेगाव पोलिस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी कांबळे यांनी भेट देवून आयोजकांचे कौतुक केले.प्रास्ताविक विलास दामले यांनी तर संचालन किर्ती बावणे यांनी केले.

# चंद्रपूर जिल्ह्यात पाणीटंचाईची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** फेब्रुवारी महिना संपण्यास आणखी आठवडाभराचा अवधी असला तरी चंद्रपूर जिल्ह्यात उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. यंदा तीव्र पाणी टंचाईची झळ बसेल, असा इशारा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाने दिला आहे. १०८.४५ टक्के पाऊस झाला असला तरी नऊ तालुक्यांतील भूजलपातळीत घट झाल्याने ग्रामीण भागात पाण्यासाठी पायपीट करावी लागणार आहे.

जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान एक हजार ४० मि.मी. आहे. २०२२-२३ यावर्षी जिल्ह्यात ११२० मि.मी. पावसाची नोंद झाली. पावसाची टक्केवारी १०८.४५ इतकी आहे. पर्जन्यमानात वाढ झाली असली तरी नऊ तालुक्यांतील भूजलपातळीत घट झाली असल्याचे निरीक्षण भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने नोंदविले आहे. यामुळे उन्हाळ्यात पाणीटंचाईची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात १३४ निरीक्षण विहिरी आहेत. जानेवारी, मार्च, मे आणि सप्टेंबर महिन्यांत या निरीक्षण विहिरीतील पाण्याच्या पातळीची नोंद घेतली जाते. यात सप्टेंबर महिन्यातील पाण्याच्या पातळीची नोंद महत्त्वाची असते. या महिन्याच्या नोंदीनुसार, जिल्हा प्रशासनाकडून टंचाईचे आराखडे तयार केले जातात. सप्टेंबर महिन्यात पाण्याच्या पातळीत घट झाल्याचे निरीक्षण भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने नोंदविले आहे. त्यात बल्लारपूर, गोंडपिंपरी, पोंभुर्णा, मूल, सावली, चिमूर, ब्रह्मपुरी, नागभीड आणि जिवती तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे या तालुक्यांत पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




# जि.प. शाळेत नमोचषक अंतर्गत चित्रकला स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लिहा जहागीर जिल्हा परिषद शाळेत नमो चषक अंतर्गत चित्रकला स्पर्धा पार पडली.

सध्या सुरू असलेल्या नमो चषक स्पर्धांमध्ये तालुक्यातील हजारो खेळाडू भाग घेत असुन याअंतर्गत लिहा जहागीर येथील जिल्हा परिषद शाळेत पाचवी ते आठवी च्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यातुन तालुकास्तरावर पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी भाजपा सोशल मीडिया तालुकाध्यक्ष समाधान पाटील नवले, महीला मोर्चा तालुकाध्यक्ष सौ. सविता ताई नवले. आन्ना मैंदसह मुख्याध्यापक गोरे सर, देविदास ताठे सर, सुवर्णा दाणे मॅडम, अंभोरे सर, दाभाडे सर, कैलास ढेपले सर, वाघ सर यांनी परिश्रम घेतले.

# दलित वस्तीत जाणारा रस्ता मोकळा करा

## नागरिकांचे गटविकास अधिकारी व सरपंच यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** दलित वस्तीतील घरांकडे जाणारा रस्ता अडवून बांधकाम केल्या जात असल्याने सदर रस्ता मोकळा करून देण्यात यावा या मागणीसाठी गिरोली बु.दलित वस्तीतील ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन न्याय हक्कासाठी हाक दिली आहे. याबाबत त्यांनी ग्रामपंचायतकडेही रस्ता खुला करून देण्याची मागणी केली असून उपोषणाचा इशारा दिला आहे.



तालुक्यातील गिरोली बुद्रुक येथील दलित वस्तीतील घरासमोरील रस्ता अडवून अतिक्रमण केले जात असून दिगंबर नंदाजी पारेकर हे घराचे बांधकाम करीत असल्याने पूर्वीपासूनचा आमचा रस्ता अडवल्या जात असल्याची तक्रार गटविकास अधिकारी व गिरोली गट ग्रामपंचायत कडे करण्यात आली आहे. सदर निवेदनात नमूद केले आहे की आमच्या गावातील झोपडपट्टी परिसरात प्रत्येक घराच्या समोर व पाठीमागून पूर्वीपासून रस्ता आहे. परंतु आमच्या घरासमोरील रस्त्यावर अतिक्रमण करून दिगंबर नंदाजी पारेकर हे घराचे बांधकाम करीत आहे. यासंदर्भात ८ फेब्रुवारी २०२४ रुबी ग्रामपंचायत कार्यालयात लेखी तक्रार नोंदविण्यात आली मात्र या तक्रारीकडे ग्रामपंचायत ने दुर्लक्ष केले आहे. दरम्यान सुनील आनंदा झीने, महादू कडूबा झिने निवृत्ती गुगळाजी झिने,यांनी गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन पूर्वीप्रमाणे रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली आहे. सदर मागणीकडे दुर्लक्ष केल्यास २३ फेब्रुवारी २०२४ रोजी ग्रामपंचायत समोर उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.



# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सिध्दार्थ वाठोरे**

**हदगाव :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आपल्या सर्वांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती धम्म ज्योती बुद्ध विहार हरडफ, ग्राम पंचायत कार्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरडफ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हदगाव, या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराजांना माता रमाई याना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज आपल्याला अन्यायाविरुद्ध लढण्याची व त्याला प्रतिकार करण्याची प्रेरणा देतात. शिस्तपूर्ण लष्कर, स्त्रीचा सन्मान व जनतेच्या हिताचा राज्यकारभार ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याची वैशिष्ट्ये होती. असे प्रतिपादन विधीतज्ञ धम्मपाल पाईकराव धम्म ज्योती बुद्ध विहार आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ते बोलत होते.

यावेळी हरडफ नगरीचा सरपंच वंदना वाठोरे, हिंदवी स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी जाधव, राहुल वाठोरे, उपा. आर व्ही वाठोरे, गौतम वाठोरे, सिद्धार्थ वाठोरे, ज्ञानेश्वर थोरात, अभय वाठोरे, आशिष वाठोरे, धम्ममेघ वाठोरे, आकांक्षा वायवळ, सुनिता वाठोरे, शिल्पा वाठोरे, शेषेराव वाठोरे, भगवान वाठोरे, उपस्थित होते.

पुढे बोलताना पाईकराव म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला मुलभूत अधिकार दिले. या मुलभूत अधिकाराचा गैरवापर होताना दिसत आहे. आई वडील याचा मानसन्मान राखला पाहिजे मा जिजाऊ ने छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर जे संस्कार केले परस्त्री माते समान तसेच संस्कार आपल्या मुला मुलींना दिले पाहिजे, यावेळी अशोक वाठोरे भगवान वाठोरे बाबुराव वाठोरे, रमेश वाठोरे, कृष्णा गिरामकर, अविनाश मोरे, गजानन सुर्यवंशी मारोती वाठोरे, सचिन वाठोरे शांताबाई नरवाडे, पाराबाई वाठोरे, अनिकेत वाठोरे अदीसह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी येथे ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बाजार सावंगी तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज भोसले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या प्रतिमेच पूजन करून त्यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी महाविद्यालयाचे कर्मचारी योगेश झिंजुर्के, मनोज राणे, योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड, वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर,श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील, राहुल गायकवाड, भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाळ बाबांची उपस्थिती होती.



# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त वेशभूषा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त हजारो शिवराय, माँ जिजाऊ व मावळे शहरात अवतरल्याचे दृश्य काल चंद्रपूरकरांना पाहावयास मिळाले. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे छ.शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारीत वेशभूषा स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी सकाळी ९ वाजता आयोजीत करण्यात आली होती. यात सहभागी विद्यार्थ्यांनी या विविध वेशभूषेसह कार्यक्रमात उपस्थीत राहुन शिवकालीन इतिहासाला उजाळा दिला. शिवजयंती उत्सवाची सुरवात गिरनार चौक येथे आयोजीत मोठ्या कार्यक्रमात मा.पालकमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते राज्यगीताच्या फलकाचे अनावरण करून करण्यात आली. याप्रसंगी बोलतांना पालकमंत्री यांनी छ.शिवरायांची प्रेरणा अक्षय ऊर्जेचा स्रोत असल्याचे सांगितले.शिवजयंती उत्सव एक दिवसाचा असला तरी महाराजांच्या विचारांची प्रेरणा ही अनंत आहे. महाराजांनी बांधलेले अभेद्य गडकिल्ले हे स्थापत्य कलेचे अप्रतिम उदाहरण आहे,हे युनेस्कोच्या माध्यमातुन जगासमोर आणण्याचा प्रयत्न करणार असुन लवकरच शिवकालीन सैनिकांचे शस्त्र दांडपट्टा आता राज्यशस्त्र म्हणुन ओळखले जाणार आहे. अठरापगड जातीं, धर्मांतील लोकांना महाराजांनी समान मानले, त्याच विचारांना धरून महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणे,गडकिल्ल्यांचे अतिक्रमण हटविणे, महात्मा फुले यांच्या वंशजांस न्याय देण्याचा विषय, बाबुराव शेडमाके व संताजी महाराज यांच्यावर पोस्ट तिकीट काढण्याचा विषय असो वा सिंदखेडराजासाठी ४०० कोटी रुपयांचा विकास आराखडा करण्याचा विषय असो असे विविध कामे करण्याचे सौभाग्य मला लाभत आहे त्याबद्दल धन्यवाद मानत असल्याचे मा.पालकमंत्री यांनी याप्रसंगी सांगितले. गिरनार चौक ते गांधी चौक येथील रस्त्यांवर शिवराय, माँ जिजाऊ व मावळे यांची वेशभूषा करून हजारो विद्यार्थी शाळानिहाय उभे असल्याने रस्ते शिवकालीन झाल्याचे दिसुन येत होते. यातील उत्कृष्ट वेशभूषा केलेले विद्यार्थी हे मनपा पार्कींग जवळील कार्यक्रम स्थळी आले व त्यांना मा. पालकमंत्री यांच्या हस्ते अँड्रॉइड टॅब, सायकल, ट्रॉली बॅग अश्या स्वरूपाची बक्षिसे देण्यात आली. सहभागी प्रत्येक शाळेला स्कुल बॅग,वॉटर बॉटल,कंपास या स्वरूपाची ३ बक्षिसे सुद्धा दिली गेली त्याचप्रमाणे प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रोत्साहनपर बक्षीससुद्धा देण्यात आले. कार्यक्रमात जवळपास १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

याप्रसंगी जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले,उपायुक्त अशोक गराटे, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे व सर्व शिवप्रेमी उपस्थीत होते.



# ओंकारनगर शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** महानगरपालिकेच्या केडगाव येथील ओंकारनगर प्राथमिक शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.राजमाता जिजाबाई, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सईबाई, सोयराबाई, मावळे यांच्या वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर भाषणे, गीते सादर केली. मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून आपण कोणते गुण घेतले पाहिजेत हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विविध वेशभूषा करून विद्यार्थ्यांनी परिसरातून मिरवणूक काढली. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रियंका लोळगे, रेश्मा पानसरे, पल्लवी भुजबळ, भावना पवार, रोहिणी काळे, दुर्गा घेवारे, संध्या तोडमल, काजल पाडळे, विश्वजीत कांबळे, शिलाबाई देसाई, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे यांची कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती होती.

# शहरटाकळी परिसरामध्ये शिवजयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** शहरटाकळी परिसरात येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिवजयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. हिंदवी स्वराज्य संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्त येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते , वेशभूषा केलेले बालशिवाजी , त्याचबरोबर बालचिमुकल्यांचे आकर्षक असे लेझीम नृत्य, शिवजन्माचा पाळणा, त्याचबरोबर विविध कार्यक्रमांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले, तसेच शहरटाकळी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित शिवजयंती उस्तव निमित्त ह. भ. प. केशव महाराज उखळीकर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आप्पासाहेब झिंजुर्के, सामाजिक कार्यकर्ते मोहन कोल्हे,राजेंद्र खंडागळे, पत्रकार रविंद्र मडके,वाय.डी.कोल्हे, ,रामचंद्र गिरम, महेश भालेराव, अमोल कावले, दीपक शित्रे आदी मान्यवर उपस्थित होते, शिक्षक संजय काळे, राजाभाऊ इंगळे ,अमोल बुधवंत , निकाळजे मॅडम यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.



# छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा नाही ही चंद्रपूरकरांची खंत : आ. किशोर जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य अश्वारूढ पुतळा व्हावा ही चंद्रपूरकरांची जुनी इच्छा आहे. तीच आमची ही इच्छा आहे. यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहे. आपण प्रशासनाला जागाही सुचविली आहे. मात्र अद्यापतरी हे स्मारक उभे झाले नाही ही चंद्रपूरकरांची खंत आहे. मात्र या स्मारकासाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. अखिल भारतीय मराठा महासंघ, चंद्रपूर मराठा समाज च्या वतीने तुकुम येथील सभागृहात आयोजित शिवजयंती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी खासदार हंसराज अहिर, ग्रामविकास अधिकारी प्रफुल निंबाळकर, मराठा महासंघाचे अध्यक्ष सुनिल चोपडे, महिला अध्यक्षा मंगला माने, भगत सिंग मालसुरे, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, सुनिल निंबाळकर, उज्वला नलगे, प्रभा शितोके, माजी नगर सेवक राजु अडपेवार, पुनमचंद्र तिवारी, सुरेश धारकर, यांची प्रमूख उपस्थिती होती तर या कार्यक्रमाला इतिहास अभ्यासक समीर लेनगुळे यांची प्रमुख वक्ता म्हणून उपस्थिती होती. पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, संपूर्ण जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते. ज्यांच्या साहस कथा, विचार, तत्त्वज्ञान आजही सर्वांना प्रेरणा देतात. चंद्रपूर जिल्ह्याला जवळपास ५०० वर्षाहून जुना इतिहास आहे. असे असतांनाही आजवर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे राहू शकले नाही ही खंत यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी बोलून दाखविली. चंद्रपूरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा व्हावा, यासाठी आमचे सातत्याने प्रयत्न राहिले आहे. या करिता आपण जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या सोबत संबंधित सर्व अधिका-यांची बैठक घेतली होती. यावेळी शिवप्रेमींनी स्मारकासाठी सुचविलेल्या जवळपास 10 जागा आपण सुचविल्या होत्या. याचा पाठपूरावाही आपण सातत्याने करत असल्याचे ते यावेळी म्हणाले.

मराठा समाजाचा शुरविर इतिहास राहिला आहे. या समाजानेही शिवस्मारक कसे असावे या बाबत सुचना करणे अपेक्षित असल्याचे ते यावेळी म्हणाले. मराठा समाज नेहमी शिव छत्रपती महाराज यांचा गौरवशाली इतिहास विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापूढे आण्यासाठी प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे लोकहिताचे विचार आपण युवा पिढी पर्यंत पोहचवित आहात. या समाजाने जागा उपलब्ध करुन दिल्यास तेथे समाज भवन निर्माण करण्यासाठी आपण 50 लक्ष रुपये देणार अशी घोषणा यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





# भिवगाव बु. येथील जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांना इस्त्रोत अभ्यासाची संधी

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई पार केल्याचा विक्रम आत्ताच भिवगांव बु शाळेच्या विद्यार्थ्यांनी नावावर केला आहे. समग्र शिक्षा अंतर्गत राष्ट्रीय अविष्कार अभियान या उपक्रमाअंतर्गत बुलडाणा जिल्ह्यामधून निवडक विद्यार्थी इस्त्रो श्रीहरीकोटा येथे १९ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत अभ्यास करणार आहे. यामध्ये भिवगाव बु येथील दहा विद्यार्थ्यांना इस्त्रो मध्ये अभ्यास करण्याची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांना प्रवास व अभ्यासासाठी शुभेच्छा देण्यासाठी गटविकास अधिकारी माननीय मुकेश माहोर, गटशिक्षणाधिकारी दादाराव मुसदवाले, केंद्रप्रमुख विनोद सोनुने, गणेश उगले, शिक्षक पतसंस्था अध्यक्ष रामेश्वर कुटे, उपाध्यक्ष चित्ते सर, लिपिक कुटे, राजेश चौधरी,उबाळे सर, शाळेचे मुख्याध्यापक विष्णु वाघ तसेच जगन्नाथ आंधळे, प्रकाश तागवाले, किरण कायंदे, गजानन दराडे, बबन कासतकर, दत्ता बाबर व हेमलता भोरजे, शिक्षक गजानन भालके व सर्व विद्यार्थ्यांना १९ फेब्रुवारी रोजी अभ्यासासाठी शुभेच्छा दिल्या.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ३६५ दिवस शिवजयंती साजरी झाली पाहिजे

## सपोनि सुशील भोसले : तरडगाव येथे शिवजयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो.आपण एखादा तास तरी समाजासाठी दिला पाहिजे.समाजात आपण जे व्यक्त होतो ते आपल्या विचारावर अवलंबून असते.आपण आपले विचार चांगले ठेवले तर सगळं काही सकारात्मक होत असतं. तुम्ही नकारात्मक विचार केले तर नकारात्मक होतं. जेव्हा एखादी गोष्ट आपण बोलतो तेव्हा ती डोक्यात येते.डोक्यात आल्यानंतर शब्द सुचतात. शब्दातून व्यक्त होत असतो. आपण ज्या पध्दतीने व्यक्त होतो. त्याप्रमाणे सवयी लागतात. ती सवय आपण वारंवार केली की त्याप्रमाणे आपण व्यक्ती बनत असतो.त्यामुळे विचार चांगले असणे गरजेचे आहेत. शिवचरित्रातून तेच विचार आपण घेतले पाहिजेत. तेच समाजा पर्यंत पोहचविले पाहिजेत. शिवजयंती हा फक्त एक दिवशी करण्याचा कार्यक्रम नाही.मला असे वाटते की, ३६५ दिवस शिवजयंती साजरी झाली पाहिजे. आपल्या आचरणातून, विचारातून प्रत्येक दिवशी शिवजयंती साजरी झाली पाहिजे, असे प्रतिपादन लोणंद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले यांनी केले.ते तरडगांव ता.फलटण येथे आयोजित करण्यात आलेल्या शिवजयंती कार्यक्रमातून बोलत होते.हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त तरडगांव ता.फलटण येथील बहुजन समाज सामाजिक विकास संघटना यांच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रम प्रसंगी विचार पिठावर लोणंद पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले यांच्या सह रमेश चव्हाण, बाळासाहेब मोहिते, बाळासाहेब अडसूळ, मोहन अडसूळ,सुभाष झुंजार आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सपोनि सुशिल भोसले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज की जय,जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव आदी घोषणा देण्यात आल्या. काही मनोगते व्यक्त केली. यामध्ये रमेश चव्हाण, मोहन अडसूळ,सुभाष झुंजार,दादासाहेब केसकर आदींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित भाषणे केली.तसेच अवंती काकडे या चिमुकल्या मुलीने भाषण करताना सर्वांची मने जिंकली. सपोनि सुशिल भोसले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या प्रेरणेतून स्वराज्य निर्माण केले. त्यामुळेच आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र हे अभ्यासून आपल्या जीवनामध्ये त्याचा पुरेपूर वापर करून हा समाज एकसंघ कसा राहील.आपल्या सर्वांचा सर्वांगीण विकास कसा होईल.हे समजणे अत्यंत आवश्यक आहे. फक्त दाढी आणि मिशी वाढवून शिवाजी महाराज होता येणार नाही. तसं आचरण असणं आवश्यक आहे.शिवाजी महाराज यांचा इतिहास हा मोगलांविषयी होता. त्यांच्या धर्माविषयी नव्हता. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात सर्व जाती धर्मांची लोकं होती. महाराज हे धर्मद्वेषी नव्हते. आपणच महापुरुष जाती जातीत वाटून घेतले आहेत, असे सुद्धा सपोनि सुशिल भोसले यांनी सांगितले. बहुजन समाज सामाजिक विकास संघटनेच्या वतीने प्रत्येक महापुरुषांची जयंती साजरी करण्याचा निर्णय हा ह्या उपक्रमाच्या अनुषंगाने घेण्यात आलेला आहे.३ जानेवारी रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना बहुजन समाज सामाजिक संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते व समस्त बहुजन वर्गातील समाज बांधव उपस्थित होते.या उपक्रमाबद्दल सुद्धा सपोनि सुशिल भोसले यांनी सर्वांचे कौतूक केले.जो उपक्रम सुरू केलेला आहे.तो उपक्रम अधिकच वाढत जावा. त्याच्या साठी आपल्याला कसलीही मदत लागली तरी आम्ही आपल्या सेवेसाठी तत्पर आहोत. असे आश्वासन सुद्धा सपोनि सुशिल भोसले यांनी दिले. सूत्रसंचालन संदीप गायकवाड व प्रास्ताविक अमोल गायकवाड यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन अतुल गायकवाड यांनी मांडले.

## चंद्रपूरमध्ये प्रथमच फिरते नेत्र चिकित्सालयाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात विकासाचा झंझावात निर्माण करून या क्षेत्राचा चेहरामोहरा बदलविणारे लोकनेते राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय तथा चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार फिरते नेत्र रुग्णालयाच्या माध्यमातून श्री माता कन्यका सेवा संस्था जनकल्याणाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये प्रथमच अशाप्रकारचा उपक्रम राबविण्यात येणार असून या माध्यमातून १८ ते २५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत खेड्यापाड्यांमधील रुग्णांचे डोळे तपासणे, निःशुल्क चष्मांचे वितरण आणि नेत्र शस्त्रक्रिया या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री माता कन्यका सेवा संस्था चंद्रपूर यांच्या सौजन्याने स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार फिरते नेत्र रुग्णालय दि. १८ फेब्रुवारीपासून नागरिकांच्या सेवेत येणार असून सकाळी १० वाजता भटाळी येथील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन होईल. दि. २५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत नियमितपणे विविध गावांमध्ये शिबिरे आयोजित करुन नेत्र तपासणी करण्यात येईल. यामध्ये गरजुंना चष्मे वितरण करण्यात येतील. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध कारणांनी वैद्यकीय सेवांचा लाभ घेणे शक्य होत नाही. अशात ते अनेक आजारांचा घरीच सामना करतात. लोकांना रुग्णालयापर्यंत येणे शक्य होत नसेल तर रुग्णालय लोकांपर्यंत जावे, या भूमिकेतून ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी फिरत्या नेत्र रुग्णालयाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. या रुग्णालयाद्वारे गावामध्येच उपचार करण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये नेत्र शस्त्रक्रियेकरिता पात्र असलेल्यांना दि. २८ रोजी आरोग्य केंद्र दुर्गापूर येथे तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करुन शस्त्रक्रिया करण्यात येईल.



## शिवजयंतीनिमित्त शिवरायांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** हिंदवी स्वराज्य संस्थापक, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम भाजपा जनसंपर्क कार्यालयात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष, पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी शिवरायांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून महाराजांना अभिवादन केले. याप्रसंगी माजी उपमहापौर अनिल फुलझेले, माजी नगरसेवक राजेंद्र अडपेवार, सुरेश भाकरे, राजु घरोटे, विनोद शेरकी, राजु येले, माजी नगरसेविका सिंधुताई राजगुरे, पुनम तिवारी, जगदीश दंडेले आदींची उपस्थिती होती. यावेळी हंसराज अहीर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यासाठी केलेल्या पराक्रमावर प्रकाश टाकला. उपस्थितांनी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

## ट्रेलरच्या धडकेत महिला ठार; एक जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** परभणी रस्त्यावरील साई मैदाना समोर ट्रेलरने दुचाकीला धडक दिली यात दुचाकी स्वार पती पत्नी गंभीर जखमी झाले पत्नीची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेताना रस्त्यातच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दि 18 फेब्रुवारी रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली
या बाबत अधिक माहिती अशी की शहरातील परभणी रस्त्यावर साई मैदाना समोर ट्रेलर क्रमांक एम एच 43 यु 4332 च्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून रस्त्यावरून जात असलेल्या दुचाकी क्रमांक एम एच 38 वाय 6494 ला जोरदार धडक दिली यात दुचाकीस्वार भानुदास नामदेव ठाकरे वय 51 वर्ष,रेणुका भानुदास ठाकरे वय 46 दोघे रा रामेश्वर हे गंभीर जखमी झाले त्यांना संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काजळे सहकारी सतीश ठोंबरे,संतोष शिंदे यांनी ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले तिथे डॉ देविदास गरड यांनी प्राथमिक उपचार केले रेणुका ठाकरे यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेत असतांना रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला.






## बाजार सावंगी येथे शिवजयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी (ताः खुलताबाद) येथे विविध शैक्षणिक संस्था जय भवानी पतसंस्था ग्रामपंचायत कार्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी झाली. गावच्या शिवछत्रपती प्रतिष्ठानचे संजय नलावडे यांनी बाजारपेठेतील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्या चे विधीवत पूजन केले.
विद्यार्थ्यांनी लेझीम पथक वाद्यासह जयघोष करीत छत्रपती शिवराय व मावळ्यांचे वेश परिधान सह संपूर्ण गावातून मिरवणूका काढल्या मैदानात लाथ्या-काठ्यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम व गीतांचे सादरीकरण केले. ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच आप्पाराव नलावडे यांनी करून अभिवादन केले ग्रामस्थ उपस्थित होते.
ज्ञान कुंज कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्य योगेश झिंजुर्के यांनी पूजन करून अभिवादन केले. प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते. सह्याद्री इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक योगेश कुचे यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते. स्टार रायझिंग इंग्रजी शाळेत प्रतिमेचे पूजन विश्वंभर नलावडे व दीपक काळे यांनी करून अभिवादन केले शिक्षक विद्यार्थी पालक उपस्थित होते. स्वामी विवेकानंद इंग्रजी शाळेत प्राचार्य कल्पना साळुंखे यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.
साई पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्य गणेश अधाने गिरीधर जाधव यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले प्राध्यापक शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते
गीता बाल विद्यामंदिर इंग्रजी शाळेत मुख्याध्यापिका निर्गुणा गायकवाड यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते. जय भवानी पतसंस्थेत संस्थापक अध्यक्ष किशोर नलावडे यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले तसेच अकराव्या वर्गात शिकणाऱ्या जगदीश गरजे याने: एक असफल से सफल बा जकी कहानीः लिखित पुस्तकाचे प्रकाशन किशोर नलावडे सरपंच आप्पाराव नलावडे ज्ञानेश्वर नलावडे यांनी केले यावेळी सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते. गावच्या शिवछत्रपती प्रतिष्ठान च्या वतीने देखील उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर